सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### उद्धव ठाकरेंची संभाजीनगरमध्ये १० जानेवारीला सभा

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना ९७ जागेवर लढत आहे. या उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे हे १० जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये सभा घेणार आहेत. मराठवाडा सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्या मैदानावर ही सभा होणार असून या सभेचा टीझर उबाठा कडून जारी करण्यात आले आहे.

### सोलापुरात आज ओवैसींची जाहीर सभा

**सोलापूर :** सोलापुरात आज एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्या जाहीर सभेचे शहरातील पानगल हायस्कूलच्या मैदानात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या १०२ जागांपैकी २३ जागांवर एमआयएम निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. नेहमीच चर्चेत राहणारे एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

### 'बिनविरोध' पॅटर्नविरोधात मनसे कोर्टात

**मुंबई :** 'बिनविरोध' विजयावरून राज्यात राजकीय रणकंदन माजले आहे. महायुतीच्या बिनविरोध विजयाविरोधात विरोधक आक्रमक झाले आहेत. 'बिनविरोध' पॅटर्नविरोधात मनसे कोर्टात जाणार असल्याची माहिती आहे. पैसे, दबाव टाकून उमेदवारांना माघार घ्यायला लावली, असा मनसेचा आरोप आहे. उमेदवारी अर्ज मागे घेणाऱ्यांचे कॉल डिटेल्स तपासण्याची मनसेने मागणी केली आहे. अर्ज माघारीदरम्यानचे व्हिडिओ मनसे कोर्टात सादर करणार आहे.

### नाशिकमध्ये प्रचारासाठी नवीन क्लृप्ती

**नाशिक :** नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी उमेदवारांकडून नवनवीन क्लृप्त्या लढवल्या जात आहेत. नाशिकमध्ये सध्या डिजिटल मीडियाचा बोलबाला असला तरी, शिंदे शिवसेनेच्या उमेदवारांनी मात्र लोकसंस्कृतीचा आधार घेत 'वासुदेव' स्टाईलने प्रचाराचा धडाका लावला आहे. वासुदेव आला हो वासुदेव आला, मत मागण्यासाठी वासुदेव आला असे खास गीत सादर करत हे वासुदेव घरोघरी जाऊन उमेदवारांचा प्रचार करत आहेत. पारंपारिक वेशभूषा, डोक्यावर मोरपिसांची टोपी आणि चिपळ्यांच्या तालावर रंगलेला हा प्रचार नाशिककरांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत असून, या अनोख्या शक्कलेमुळे प्रचाराची चांगलीच चर्चा रंगली आहे.

### सांगलीत 'मविआ'ची छुपी खेळी

**सांगली :** सांगली महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत काँग्रेस नेते विश्वजित कदम यांच्या एका विधानाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडीला सर्व जागांवर उमेदवार मिळाले नाहीत, या विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना कदम म्हणाले की, आमचे ७८ च्या ७८ जागांवर उमेदवार उभे आहेत, समजने वाले को बस इशारा काफी है! असे विधान केले आहे. या विधानाद्वारे कदम यांनी काँग्रेस आणि दोन्ही राष्ट्रवादी गटांमध्ये छुपी युती असल्याचे अप्रत्यक्षपणे मान्य केल्याची चर्चा रंगू लागली आहे. सांगलीच्या विकासाची धमक घेऊन आमचे उमेदवार मैदानात उतरले असून आघाडी पूर्ण ताकदीने लढत असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### राज्यात ढगाळ हवामानाचा मुक्काम

**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून कडाक्याची थंडी पडल्यानंतर आता हवामानात अचानक मोठा बदल झाला आहे. राज्याच्या अनेक भागांत थंडीचा कडाका ओसरला असून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या हवामान बदलाचा सर्वाधिक फटका कोकण आणि मध्य महाराष्ट्राला बसला असून, ऐन भरात आलेल्या आंबा आणि काजूच्या हंगामावर संकटाचे सावट निर्माण झाले आहे.

### ट्रेकिंगसाठी गेलेले २५ विद्यार्थी जखमी

**पुणे :** राजगड तालुक्याच्या मढेघाट भागात काल संध्याकाळी एका सहलीदरम्यान आग्या मोहोळाच्या मधमाशांनी अचानक भीषण हल्ला चढवला. या अनपेक्षित संकटामुळे मढेघाट ते उपंडा असा ट्रेक करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी पळापळ झाली. पुण्यातील एका खासगी साहसी ट्रेकिंग क्लासच्या माध्यमातून सुमारे ५० हून अधिक विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक या ट्रेकसाठी आले होते.

### सरवदे हत्या प्रकरणातील चार आरोपींना पकडलं

**सोलापूर :** सोलापूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मनसे विद्यार्थीसेनेचे सोलापूर शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे खून प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तळबीड पोलिसांनी तासवडे टोलनाक्यावर सापळा रचत चार आरोपींना अटक केली. पकडण्यात आलेल्या चारही संशयित आरोपींना पुढील तपासासाठी सोलापूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. काही दिवसांआधी सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमेदवारीच्या वादातून मनसे विद्यार्थीसेनेचा शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदेंचा खून झाला होता.

# ट्रॅक्टरची ट्रॉली अंगावर कोसळून कामगाराचा मृत्यू

## गणेश डोंगरेला रीलस्टार म्हणूनही ओळखायचे । पत्नी अश्विनी फेसबुक लाईव्ह असतानाच घडली दुर्घटना

**बीड :** बीडमध्ये एका ऊसतोड कामगाराचा अंगावर ट्रॅक्टरची ट्रॉली कोसळून दुःखद मृत्यू झाला आहे. गणेश डोंगरे असं या ऊसतोड कामगाराचं नाव असून, तो रीलस्टारही होता. गणेश डोंगरे याच्यावर सगळ्या कुटुंबाची जबाबदारी होती. गणेश डोंगरेच्या अंगावर ट्रॉली कोसळली तेव्हा त्याची पत्नी फेसबुकवर लाईव्ह करत होती. तिच्या डोळ्यांदेखत पतीचा जीव गेला, मात्र ती काही करु शकली नाही. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गणेश डोंगरे आपल्या कुटंबासह बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी (सोन्नाखोटा) येथे राहत होता. गणेश डोंगरे उदरनिर्वाहासाठी ऊसतोडीचं काम करत असे. सध्या ऊसतोडीचा हंगाम असल्याने आपल्या पत्नीसह तो ऊस घेऊन कारखान्यात पोहोचले होते. यावेळी त्याच्यासह त्याची पत्नी आणि तीन चिमुकल्या मुलीदेखील होत्या. यावेळी एका ट्रॅक्टरची ट्रॉली त्याच्या अंगावरुन गेली आणि त्याने जागीच जीव गमावला. गणेश



डोंगरेच्या मागे त्याची पत्नी, तीन मुली आणि आई-वडील असा परिवार आहे.

बीड ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. याच बीडमधील गणेश आणि अश्विनी लातूरमध्ये ऊसतोडीसाठी पोहोचले होते. ऊस तोडल्यानंतर ते साखर कारखान्यात पोहोचले होते. यावेळी अश्विनी

### तीन चिमुकलींचं पितृछत्र हरपलं, महाराष्ट्र हळहळला

फेसबुक लाईव्ह करत साखर कारखान्याचा परिसर दाखवत होती. व्हिडीओत गणेश डोंगरेदेखील दिसत आहे. हे फेसबुक लाईव्ह सुरु असतानाच अश्विनी किंचाळताना दिसत आहे. याचं कारण एका ट्रॅक्टरची ट्रॉली गणेशच्या अंगावर कोसळते. यावेळी गणेशचा जागीच मृत्यू होतो. अश्विनीच्या डोळ्यादेखत पतीचा जीव गेला, मात्र ती काही करु शकली नाही. ही घटना समोर आल्यानंतर एकच हळहळ व्यक्त होत आहे.

'लातूर जिल्ह्यातील ज्या साखर कारखान्यावर हा अपघात झाला तो केवळ साखर कारखान्याच्या चुकीमुळे झाला आहे. ज्या ठिकाणी वाहने उभे राहतात त्या ठिकाणी व्यवस्थित रस्ता नाही. त्यामुळे हा अपघात कारखान्याच्या चुकीमुळे झाला आहे. विशेष म्हणजे कारखान्यावर वेळेवर माप होत नव्हते आणि माप न झाल्यामुळे गणेशला आपले वाहन मापाच्या प्रतीक्षेत उभे करून थांबावं लागलं होतं. त्यामुळे अपघाताची जबाबदारी स्वीकारून साखर कारखान्याने गणेशच्या तीन लेकरं, पत्नी आई-वडिलांसाठी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत तत्काळ द्यावी व त्यांच्या पालनपोषण, शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी' अशी मागणी केली जात आहे.

### धनंजय मुंडे यांची भावुक पोस्ट

परिस्थितीने अत्यंत गरीब पण स्वाभिमानाने ऊसतोडणी करून आपल्या कुटुंबीयांचे निर्वहण करणाऱ्या आमच्या या बांधवाच्या अकाली निधनानंतर त्याचे मुले-बाळे व कुटुंब उघड्यावर पडणार नाही, याची काळजी आम्ही घेऊ, असेही धनंजय मुंडे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. राज्य शासनाने लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून या कुटुंबाचे आर्थिक संरक्षण व पुनर्वसन करण्याची लेखी मागणी शासनाकडे करणार आहे. ऊसतोड कामगारांचे नेहमी घडणारे अपघात तसेच त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक संरक्षण व स्थैर्य याबाबत राज्याचा सामाजिक न्याय विभागाचा मंत्री असताना मी प्रस्तावीत केलेल्या योजना पूर्णत्वास नेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घेणे गरजेचे असल्याचे मुंडे म्हणाले.

# राज्यातील १६ कृषी बाजार समित्यांचे होणार राष्ट्रीयकरण

**मुंबई :** राज्यातील शेतीमालाच्या बाजारव्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या निर्णयाच्या दिशेने राज्य शासनाने आणखी एक पाऊल टाकले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा (ई-नाम अंतर्गत) देण्याचा निर्णय यापूर्वीच जाहीर करण्यात आला होता. आता या निर्णयाला गती देत विधी व न्याय विभागाने संबंधित गॅझेट अधिसूचना प्रसिद्ध केली असून, कोल्हापूरसह राज्यातील सोळा बाजार समित्यांची सविस्तर माहिती पणन विभागाकडून मागवण्यात आली आहे. त्यामुळे या समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता बळावली आहे.

राज्य शासनाने राष्ट्रीय दर्जा देण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संबंधित बाजार समित्यांकडून शेतीमालाच्या वार्षिक आवकेची सविस्तर आकडेवारी मागवली आहे. या अंतर्गत वर्षभरात बाजार समितीत येणाऱ्या एकूण शेतीमालाची आवक, तसेच इतर राज्यांतून येणाऱ्या शेतीमालाचे प्रमाण किती आहे, याची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.




**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा केली. यावेळी ज्येष्ठ गीतकार, कवी व पटकथा लेखक जावेद अख्तर, प्रसिद्ध अभिनेते आणि एक्सेल एंटरटेनमेंटचे संस्थापक फरहान अख्तर, एक्सेल एंटरटेनमेंटचे सहसंस्थापक आणि चित्रपट निर्माते रितेश सिधवानी, युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपचे एक्झिक्यूटिव्ह वाइस प्रेसिडेंट (मार्केट डेव्हलपमेंट) डम ग्रॅनाइट, युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपचे भारत आणि दक्षिण एशियाचे चेअरमन आणि सीईओ देवराज सान्याल व इतर मान्यवर उपस्थित होते.

# नांदेडचा महापौर भाजपाचाच असेल : फडणवीस




**तभा वृत्तसेवा**

**नांदेड, दि. ५ जानेवारी :** खासदार अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नांदेड महापालिकेची निवडणूक होत असून त्यांनी केलेल्या विकास कामाच्या जोरावर नांदेडचा महापौर भाजपाचाच असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नांदेड महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार अशोक चव्हाण, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, आमदार तुषार राठोड, आमदार भिमराव केराम, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार जितेश अंतापूरकर, संतुक हंबर्डे, अमर राजूरकर आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विकसित नांदेडचा संकल्पनामा तयार करण्यात आला आहे. यात विकासाची झालेली कामे व होणारी कामे याचा उल्लेख आहे. या संकल्पनाम्याच्या पाठिशी भारतीय जनता पार्टी नेहमीच असेल. मागील ७० वर्ष गावाचा विकास हि एकच संकल्पना होती. त्यामुळे शहराचा विकास कमी पडला. परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शहरे विकासाची केंद्रे असून, यासाठी स्मार्ट सिटी, अमृत आदी योजना राबवून शहरासाठी निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे २०१६ नंतर शहराची परिस्थिती बदलेली आहे. त्यातच प्रत्येकाला घर हि संकल्पना नरेंद्र मोदी यांची असून, यासाठी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण देखील नियमित करण्याचा कायदा करण्यात आला आहे. कचऱ्यापासून कोळसा, खत निर्मिती करण्यात येत आहे. तर नांदेडात कॅन्सर हॉस्पिटल सुरु करण्यात येणार असून, नांदेड-लातूर, नांदेड-बिदर रेल्वे सेवेसाठीही अर्धी रक्कम महाराष्ट्र शासनाने देण्याचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिण योजनेबरोबरच लखपती दिदींच्या संख्येत वाढ व्हावी अशी अपेक्षाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

# बस-दुचाकी भीषण अपघातात तिघे ठार




**बुलढाणा :** बुलढाणा-छत्रपती संभाजी नगर महामार्गावर धाड गावाजवळ जवळ एसटी बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक झाली आहे. या भीषण अपघातात दुचाकी वरील ३ युवकांचा जागीच मृत्यू झाला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार शिवशाही एसटी बस छत्रपती संभाजी नगरहून बुलढाण्याकडे जात होते. त्यावेळी समोरून दुचाकी आली दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात ३ तरुणांनी जीव गमावला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, धाड गावाजवळ शिवशाही बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की या अपघातात दुचाकीचा चक्काचूर झाला आहे. या अपघातानंतर स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेत तातडीने रुग्णवाहिका बोलवली. मात्र रुग्णालयात नेण्यापूर्वीच कैलास दांडगे, रवी चंदनशिव व अंकुश पाडळे या तरुणांचा मृत्यू झाला होता.

कैलास दांडगे, रवी चंदनशिव व अंकुश पाडळे या तिघांचे वय २० च्या आसपास आहे. हे तिघे संभाजीनगरच्या दिशेने जात होते, मात्र शिवशाही बसला धडक बसल्याने या तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. हे तिघेही बुलढाणा तालुक्यातील ढाल सावंगी गावातील रहिवासी आहे. या अपघातामुळे या गावासह परिसरावर शोककळा पसरली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या अपघातानंतर घटनास्थळी मोठा जमाव जमला होता. त्यामुळे अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. आता पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली आहे.

या घटनेमुळे कैलास दांडगे, रवी चंदनशिव व अंकुश पाडळे यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघाताचे काही फोटो समोर आले आहेत. यात दुचाकी चाकलाच्या बाजूने बसला घडकली असल्याचे दिसत आहे.

# तब्बल ८७९ महिला मुंबईतून उमेदवार

**मुंबई :** देशातील श्रीमंत महानगरपालिकांपैकी एक असलेल्या मुंबई महानगरपालिकेत सत्ता आणण्यासाठी सर्व पक्षांकडून प्रयत्न केले जात आहेत. मात्र मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पुरुषांपेक्षा महिला उमेदवारांची संख्या जास्त असल्याचं दिसून आलं आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत १७०० उमेदवार आहेत. त्यात ८२१ पुरुष तर महिलांची संख्या ८७९ आहे. पालिकेच्या २२७ प्रभागांपैकी ११४ प्रभाग महिलांसाठी आरक्षित आहे. त्यामुळे सर्व जागांवर मिळून एकूण ८७९ महिला निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. भाजपच्या १३७ उमेदवारांपैकी ७६ महिला उमेदवारांची संख्या आहे.

देवनार, मानखुर्द, चेंबूर, गोवंडी - ६८, वडाळा, दादरचे प्रभाग, शीव - ६६, धारावी, महिम, दादर-जवळील काही भाग - ५९, अंधेरी पूर्व - ५६, घाटकोपर - ५१, भायखळा, चिंचपोकळी, रे रोड - ५०, अंधेरी पश्चिम - ४६, भांडुप - ४६, मालाड - ४२, मुलुंड - ३७, कुर्ला - ३५, वरळी, प्रभादेवी परिसर - ३४.

# साडीच्या ऑफरमुळे महिलांची चेंगराचेंगरी

**छत्रपती संभजीनगर :** सध्या छत्रपती संभजीनगरमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. एक रीलस्टार ची रील पाहून महिलांनी साडी खरेदीसाठी मोठ्या




प्रमाणात गर्दी केली. साडीवर असलेल्या सवलतीमुळे महिलांची प्रचंड गर्दी झाली आहे.५ हजारांची साडी फक्त ५९९ मध्ये मिळत असल्याच समजल्यावर एकाच वेळी हजारो महिलांनी दुकानात गर्दी केली. या चेंगराचेंगरीत ३ महिला बेशुद्ध पडल्या. तर अनेक चिमूकल्यांची आईपासून ताटातुट झाली.

संभाजीनगर रोड ते त्रिमूर्ति चौकाच्या दरम्यान एक नवीन साड्यांच दुकान सुरू झालं आहे. साडीच्या दुकानदारानी ३ महिन्यापासून साडीच्या रील बनून सोशल मीडिया वर टाकल्या होत्या आणि ,त्या रीलला भुलून शहरातील वेगवेगळ्या भागातील महिला साडी खरेदीसाठी इथे आल्या होत्या. जवळपास हजारपेक्षा अनेक महिला ह्या आपल्या कुटुंबासोंबत तर कोणी आपल्या लहान मुलांना घेऊन आल्या होत्या. एवढ्या सगळ्या महिला एकत्र आल्यावर दुकानसमोर प्रचंड अशी गर्दी झाली. ५००० ची सदी केवळ ५९९ ला मिळते कळताच अनेक महिलानी दुकानात गर्दी केली.

यामध्ये एका चिमूकलीची आईपासून ताटातुट झाली. परिस्थितीच गांभीर्य घेता पोलिस घटनास्थळी पोहचले. परीस्थिती हाताबाहेर जाते याचा अंदाज येताच पोलिसांनी तबडतोप दुकान बंद केल. पोलिस वेळेवर पोहचल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बालाजी मंदिर ते यशोदा चित्रमंदिर रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहरातील बालाजी मंदिर ते यशोदा चित्रमंदिर , अंबाजोगाई बस स्थानक क्रं . २ कडे जाणाऱ्या रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरल्याने भुरट्या चोरीच्या घटनात वाढ होण्याच्या शक्यतेने नागरिकातघबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.शहरातील बालाजी मंदिर, पापविनाश रोडपासून अंबाजोगाई रोडवरील बस स्थानकाकडे जाणारा हा रस्ता मागच्या काही वर्षांपासून अतिशय वर्दळीचा झाला आहे. मुख्य रस्त्यावरील वाहतुकीच्या कोंडीतअडकण्यापेक्षाया रस्त्याने जाण्यास वाहनधारक प्राधान्य देताना दिसतात. दिवसा - रात्री कोणत्याही वेळेस हा रस्ता कायम गजबजलेला असतो. मात्र, रात्रीच्या वेळी या रस्त्यावरील बहुतांश भागात पथदिवे नसल्याने अंधाराचे साम्राज्य दिसून येते. अंधारामुळे महिला, युवतींना या रस्त्यावरून जाताना अनाहूत भीती वाटते. कायम वर्दळीच्या असणाऱ्या या रस्त्यावर लख्ख प्रकाशासाठी विजेची सोय करून देणे अत्यावश्यक आहे. या भागातील नागरिक सातत्याने अंधार दूर करण्याची मागणी करत असतात. मात्र प्रशासन त्याकडेफारसेगांभीर्याने पाहताना दिसत नाही. त्यामुळे किमान महानगरपालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर हा होईना या रस्त्यावरील अंधाराचे साम्राज्य दूर करावे,अशी अपेक्षा नागरीकातून व्यक्त केली जात आहे.



# नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू!

## संतप्त माता-पित्याची न्यायाची मागणी; सोमवारी लातूरच्या गांधी चौकात केला रस्ता रोको

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या चिंचोलीराव वाडी येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. अनुष्का किरण पाटोळे हिचा संशयास्पद मृत्यू झाल्याने जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. सदर विद्यार्थिनीने टॉवेलने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे शालेय प्रशासनांकडून सांगण्यात येत असले तरी कोणालाही न पटणारी आहे. याच कारणावरून मृत विद्यार्थिनीच्या पालकांनी या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कार्यवाही केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा इशारा दिला आहे. सोमवारी न्यायाच्या मागणीसाठी लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात संतप्त महिलांनी रास्ता रोकोही केला.



जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या वर्गात शिकणारी कु. अनुष्का पाटोळे ही औसा तालुक्यातील टाका या गावाची होती. अनुष्काच्या पालकांना ती आजारी असल्याचा दूरध्वनी करून शाळा प्रशासनाने लातूरला बोलावून घेतले. तिचे आई-वडील लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयात आले असता त्यांना अनुष्काचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समजले. पालकांना नेमके काय झाले होते? हे सांगण्याचा प्रयत्नहीशाळा प्रशासनाकडून न झाल्याने घडल्या प्रकाराबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. अनुष्काने टॉवेलने बाथरूममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत असले तरी वास्तव काहीतरी वेगळे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

अनुष्काच्या आई-वडिलांनी अनुष्काने आत्महत्या केली नसून तिचा खून करण्यात आला असल्याचा आरोप केला असून या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी लावून धरली आहे.

हा प्रकार रविवारी सकाळच्या दरम्यान घडला असल्याचे सांगितले जात आहे. जर अनुष्काने गळफास घेऊन आत्महत्या केली होती तर त्याच ठिकाणी तात्काळ पोलीस बोलावून घेऊन तिथेच मृतदेहाचा पंचनामा का केला गेला नाही? असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे. अभ्यासात हुशार असणाऱ्या आपल्या मुलीकडून असा आत्मघाती प्रकार होणे कदापि शक्य नसल्याचा दावा आई - वडील करत आहेत. एकंदरच हा मृत्यू संशयास्पद असून आई-वडिल व नातेवाईकांनी दोषींवर कार्यवाही होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे सांगितल्याने सोमवारी सायंकाळपर्यंतही कु. अनुष्काच्या मृतदेहाची शव विच्छेदन प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती.

सामान्य लातूरकरांमध्येही या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले जात असून या प्रकरणातील दोषी असणाऱ्यांवर कठोर कार्यवाही व्हावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

## 'महात्मा बसवेश्वर'चा मतदान जनजागृती वाकेथॉनला प्रतिसाद




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका, लातूर रोटरी क्लब परिवार, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, युवती मंच आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत क्रीडा संकुल ते टाऊन हॉल पर्यन्त निघालेल्या मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या रॅलीत महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवी सोनोने, प्रा. के. आर. सूर्यवंशी, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. आशीष क्षीरसागर, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. उदयकुमार धनुरे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. कल्पना गिराम, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. नीता दलगडे, प्रा. पूजा घार, प्रा. महादेवी धडे आणि संगमेश्वर मुळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या रॅलीत लोकशाहीमधील मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा, कट आउट, बॅनर लावून येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचा मतदानाचा टक्का वाढावा याकरिता जनप्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही सहभागाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## व्यंकटेश विद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द : कांबळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** येथील श्री व्यंकटेश शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालयातील २३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बोगस वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा तसेच उच्च माध्यमिकच्या ५ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवला असल्याची माहिती मराठवाडा प्रदेश निराधार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

श्री व्यंकटेश शिक्षण संस्थेवर सन १९९७ पासून ते आजतागायत अधिकृत कार्यकारी मंडळ अस्तित्वात नसतानाही संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ब्रिजमोहन अग्रवाल व सचिव प्रशांत शिवप्पा पटणे यांनी तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांशी संगनमत करून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक व्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोपही मिलिंद कांबळे यांनी यावेळी केला. या शिक्षण संस्थेतील स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध आपण वेळोवेळी आवाज उठवला असून सातत्याने हा विषय शिक्षण विभागाकडे लावून धरला आहे. आपल्या संपूर्ण पुराव्यानिशी दाखल केलेल्या तक्रारीची शहनिशा करून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने या प्रकरणाची सुनावणी दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घेतली. या सुनावणीस संस्थेचे स्वयंघोषित अध्यक्ष - सचिव यांसह ज्यांच्या नेमणुकीविषयी तक्रार करण्यात आली आहे ते सर्व कर्मचारी, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक शिक्षण संचालक तथा अन्य अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीचा निर्णय दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आला.

### सुनावणीच्या निर्णयास स्थगिती : डॉ. दत्तात्रय मठपती

श्री व्यंकटेश विद्यालयातील २३ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतलेला निर्णय आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ५ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्तावाविभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, संबंधित शिक्षकांनी दि. १८ डिसेंबर रोजी तक्रारीच्या प्रतिची मागणी केली. असल्याने त्यांना दि. ३१ डिसेंबर रोजी तक्रारीची प्रत उपलब्ध करून देण्यात आली आली. प्रत दिल्यानंतर शिक्षकांना त्यावर अभिप्राय सादर करण्यास कळविण्यात आले आहे. शिक्षकांना तक्रारीच्या अनुषंगाने अभिप्राय सादर करता यावा व याचिका क्र. ५२५०/ २०२५ मधील निर्णय अद्याप प्रलंबित असल्यामुळे तूर्तास दि. २९ डिसेंबरच्या २८ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यता रद्द करण्याचा घेतलेला निर्णय पुनर्विचार करण्याबाबत शिक्षकांनी दि. ३० डिसेंबर रोजी दिलेल्या विनंती अर्जानुसार तसेच न्यायालयात शिक्षकांची याचिका प्रलंबित असल्यामुळे दि. २९ डिसेंबर २०२५ रोजीचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी दिली.

शिक्षण उपसंचालकांच्या सुनावणीत २३ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर उच्च माध्यमिकच्या पाच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्यात आला आहे.

## भारतीय सैन्यदलात तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १९ जानेवारी, २०२६ ते ३ एप्रिल, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६६ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १३ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून सीडीएस-६६ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे : भिक्खु पय्यानंद थेरो

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** जगामध्ये शालेय शिक्षण आणि आध्यात्मिक शिक्षण असे ज्ञानाचे प्रकार आहेत. शालेय ज्ञान हे भौतिक साधनांची परिपुर्तता करते तर आध्यात्मिक ज्ञान हे मनुष्याचे वैचारिक आणि व्यक्तिमत्व उंचावते. ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे. पौष पौर्णिमेनिमित्त महाविहार, सातकर्णी नगर येथे आयोजित धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

भिक्खू पय्यानंद थेरो पुढे म्हणाले की, ज्ञान हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. आजचे शालेय शिक्षण माणसाला कौशल्ये, रोजगार व भौतिक प्रगतीकडे घेऊन जाते; मात्र त्याला पूरक म्हणून आध्यात्मिक शिक्षणाची नितांत गरज आहे. आध्यात्मिक ज्ञानाशिवाय शालेय शिक्षण अपूर्ण ठरते, आध्यात्मिक शिक्षणामुळे मनुष्याला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी मिळते. विचारांची शुद्धता, आचारातील संयम, करुणा, मैत्री आणि समत्व या मूल्यांची जोपासना आध्यात्मिक ज्ञानातूनच होते असेही ते म्हणाले.

याप्रसंगी कार्यक्रमास प्रा. शिवशरण हावळे, इंजि. एम. एन. गायकवाड, चेअरमन



विठ्ठल जाधव, माजी सरपंच सुनील बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कांबळे, पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन आदि मान्यवर, आठवी अ. भा. बौद्ध धम्मपरिषद यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल महाविहार धम्मसेवक ग्रुप सदस्य आणि डॉ. जितेंद्र वाघमारे यांची पशुसंवर्धन विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रशांत जानराव, सत्यप्रकाश कांबळे, आम्रपाल बनसोडे, जयंत कांबळे, त्र्यंबक कवठेकर, मारोती सरवदे, अंतेश्र्वर थोटे, संतोष कसबे, आकाश सरवदे, राहुल शाक्यमुनी, निलेश बनसोडे, विशाल वाहुळे, उत्तम गायकवाड, विलास अवशंख, गौतम चिकाटे, वसंत वाघमारे, कृष्णा सुरवसे, गोविंद जोगदंड, शामल कांबळे, उज्वला सिरसाट, शोभा सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुरेखा दंडे, निर्मला थोटे, कविता कदम, सरिता बनसोडे, निर्मला गौरकर, कांता सरवदे, पंचशीला बनसोडे, स्वाती सूर्यवंशी, पंचशीला बनसोडे, माया धावारे, यांच्या सह विविध नगरातील महिला मंडळी यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

## पाथरवाडीच्या अध्यात्मिक पीठात मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन, विवेकानंद कॅंसर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल अँड ए.व्ही. देसाई आय इस्क्टिट्यूट, श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ ,पाथरवाडीच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी मोफत कर्करोग निदान, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर अध्यात्मिक पीठात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार आहे. या शिबिराचा परिसरातील गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा,असे आवाहन रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अमोल दाडगे , सचिव पवन मालपाणी, मोतीराम वर्मा, प्रकल्प प्रमुख किशोर दाताळ , समन्वयक नवनाथ मद्दे मामा आदी मान्यवरांनी केले आहे.

## जिल्ह्यात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध

### तक्रारींसाठी तालुका, जिल्हास्तरीय कृषी कार्यालयाकडे संपर्क साधावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाच्या पेरण्या पूर्ण होवून पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. जिल्ह्यात रासायनिक खतांच्या संतुलित वापरासाठी विविध प्रकारच्या खतांचे ग्रेड आवश्यक त्या प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. जिल्ह्यामध्ये खतांची टंचाई परिस्थिती नाही, तरीही काही भागांमधून युरिया या खताच्या संदर्भामध्ये कृषी निविष्ठा विक्री केंद्रामध्ये युरिया खत उपलब्ध असताना शेतकऱ्यांना नाही म्हणणे, वाढीव दराने विक्री करणे व युरिया या खतासोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. शेतकऱ्यांना युरिया संदर्भामध्ये काही तक्रारी असतील त्यांनी तात्काळ तालुकास्तराव कृषी अधिकारी, गुण नियंत्रण यांच्याकडे किंवा जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर किंवा लातूर जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.

युरिया खत बॅगमध्ये अहमदपूर - १३ हजार २३६ बॅग, औसा - १२ हजार ३३५ बॅग, चाकूर- १ हजार ९४६, देवणी-४ हजार ८०८ बॅग, जळकोट -३ हजार ८५३ बॅग, लातूर -३२ हजार ४९६ बॅग, निलंगा -१४ हजार ८०९ बॅग, रेणापूर -६ हजार ४५७ बॅग, शिरुर अनंतपाळ -५ हजार १३० बॅग, उदगीर -११ हजार ५० बॅग.

तसेच जिल्ह्यामध्ये डीएपी-४१ हजार ४२० बॅग, एनपीकेएस-२ लाख ३२ हजार २९० बॅग, एसएसपी १ लाख ९० हजार ४२३ बॅग उपलब्ध असून रासायनिक खतांची कोणतीही कमतरता नाही. जिल्ह्यामध्ये कृषि निविष्ठा विक्रेत्यांनी युरिया उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना न दिल्यास, जादा दराने विक्री केल्यास व युरिया सोबत लिंकिंगद्वारे इतर निविष्ठा दिल्यास संबंधित विक्रेत्यांवर खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित तालुक्यातील निरीक्षकांना लातूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिल्या आहेत. जिल्हास्तरीय भरारी पथकामार्फत लातूर जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांची वेळोवेळी तपासणी सुरु असून यापुढेही तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती लातूर जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी दिपक सुपेकर यांनी दिली आहे.

## थोडक्यात...

### कामकाजाच्या नियोजनामध्ये दैनंदिनी महत्त्वाची : गिते



**अ.नगर :** नियोजनपूर्वक काम केल्यास निश्चितच यश मिळते. त्याकरिता कामकाजाच्या नियोजनासाठी दैनंदिनी अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले. जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालये तसेच वर्तमानपत्र कार्यालयांची माहिती ई मेल आयडी असलेल्या महसूल मित्र दैनंदिनी २०२६ चे प्रकाशन गिते यांच्या हस्ते करण्यात आले. दैनंदिनीचे हे १० वे वर्ष असून यातील माहिती अतिशय उपयोगी ठरत असल्याचे दैनंदिनीचे संपादक अभय ललवाणी यांनी सांगितले. यावेळी श्री शनैश्वर देवस्थान-शनिशिंगणापूरचे सहायक अधिकारी तथा उप जिल्हा भूसंपादन अधिकारी अतूल चोरमारे, राजशिष्टाचार अधिकारी स्वप्निल फलटणे, ज्येष्ठ पत्रकार महेश महाराज देशपांडे उपस्थित होते.

### 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ५ जानेवारीपासून

**छत्रपती संभाजीनगर :** लोकप्रिय विनोदी कार्यक्रम 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' नव्या सीझनसह ५ जानेवारीपासून पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा कार्यक्रम दर सोमवार आणि मंगळवार रात्री ९ वाजता फक्त सोनी मराठी वाहिनीवर प्रसारित होणार आहे. नव्या सीझनमध्ये नवीन स्किट्स, व्यक्तिरेखा आणि ताजे विषय पाहायला मिळणार असून प्रेक्षकांचा आवडता कलाकार ओंकार भोजने याचे नव्या प्रहसनासह पुनरागमन हे खास आकर्षण ठरणार आहे. दैनंदिन ताणतणाव विसरून हास्याची मेजवानी देणारा आहे.

### अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**मुंबई :** सिम्बॉयसिस इंटरननॅशनल (अभिमत विद्यापीठ)तर्फे सिम्बॉयसिस एन्ट्रंस टेस्ट २०२६ (सिम्बॉयसिस एन्ट्रंस टेस्ट) आणि एसआईटीईई २०२६ (सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग एन्ट्रंस एक्झाम) ची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठातील अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांसाठीच्या या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना १५ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज करता येईल. सिम्बॉयसिस एन्ट्रंस टेस्ट आणि एसआईटीईई या कम्प्युटर बेस्ड टेस्ट (उइढ) परीक्षा सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ)तर्फे सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूटमधील बीबीए, बीसीए, बीए, बीएस्सी आणि बीटेक अशा विविध अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांसाठी घेतल्या जातात. विद्यार्थ्यांना दोन वेळा ही परीक्षा देता येते आणि त्यातील सर्वाधिक गुण ग्राह्य धरले जातात.

### कौशल्य विकास आणि उद्योग-संरेखित शिक्षणाद्वारे वास्तुविशारद करिअरची पुनर्व्याख्या

**मुंबई :** आर्किटेक्चर, इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन क्षेत्रातील व्यावसायिकांचे कौशल्य वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या नोव्हाट्र या अग्रगण्य एडटेक प्लॅटफॉर्मने आपल्या आर्किटेक्चर प्रोग्रामसाठी करिअर यश अहवाल (२०२४-२०२५) प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल करिअर प्रगती, उद्योगातील स्वीकारार्हता आणि जागतिक रोजगारक्षमतेमधील सातत्यपूर्ण परिणामांवर प्रकाश टाकतो, तसेच भारत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील कौशल्यांमधील तफावत दूर करण्यात आणि वास्तुविशारदांना उच्च-प्रभावी डिजिटल भूमिकांमध्ये संक्रमण करण्यास सक्षम बनवण्यात नोव्हाट्रच्या भूमिकेला अधोरेखित करतो.

### पात्राच्या भावनांशी कसे संलग्न

**मुंबई :** गुजराती चित्रपटांत आपले स्थान निर्माण केल्यावर आणि 'जयेशभाई जोरदार', 'कौशलजीज VS कौशल' आणि 'धडक २' सारख्या बॉलीवूड चित्रपटांमध्ये आपली उपस्थिती नोंदवल्यानंतर आता दीक्षा जोशी छोट्या पडद्यावर सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत दीप्तीच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. टेलिव्हिजनवर पदार्पण करत, दीक्षा या मालिकेतील सात वर्षांच्या लीपनंतर त्यात दाखल झाली आहे.

### श्रद्धा, प्रेम आणि दिव्य आशीर्वाद लाभलेला हा विवाह आहे

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' ही मालिका एका नवीन टप्प्यात प्रवेश करत आहे. गणेशाचा मंगल विवाह सध्या केंद्रस्थानी असून मालिकेच्या कथानकाला लक्षणीय वळण देणारी ही घटना आहे. या बदललेल्या भागात आनंद सोहळा, कर्तव्य आणि बदल एकत्रित दिसतील आणि प्रथम पूज्य म्हणून गणेशाचे स्थान मजबूत होताना दिसेल. गणेश आपल्या जीवनाच्या या नवीन टप्प्यात केवळ धार्मिक विधींमध्येच नाही, तर जबाबदारी, विनम्रता आणि नेतृत्व या मूल्यांसाठीही सर्वात आधी पूजला जातो.

### उंडणगाव अंगणवाडीत सावित्रीबाई फुले जयंती


**सिल्लोड :** उंडणगाव येथील अंगणवाडी शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली कार्यक्रमाला अंगणवाडी सेविका शीला बोर्डे मदतनीस ललिता पाटील प्रीती पाटील निर्मला वाघ जाकीर शेख शेरीपा पठाण अशा खडके सुनिता मोकासरे यांची कार्यक्रमाला उपस्थित होती.

### 'इत्ती सी खुशी' मालिकेत गरिमा कौशलची एंट्री

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)चा प्रवास उलगडून दाखवला आहे. आत्ता अन्विता संजय (ऋषी सक्सेना)च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराट (रजत वर्मा)चा अजून मनावर असलेला प्रभाव यामध्ये सापडली आहे. त्यात विराटचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या दमदार उपस्थितीमुळे मामला आणखीन गुंतागुंतीचा झाला आहे. अन्विताला काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, ज्यात तिची ताकद आणि नाती यांची कसोटी होणार आहे.

### सौ. वृंदा बापूसाहेब कवठेकर यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** विश्व हिंदू परिषदचे माजी देवगिरी प्रांत कोषप्रमुख श्रीधर ऊर्फ बापूसाहेब कवठेकर यांच्या पत्नी सौ. वृंदा बापूसाहेब कवठेकर (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने आज सकाळी ८ वाजता निधन झाले. त्यांनी स्वानंद उत्कर्ष, श्रेय नगर, छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने कवठेकर कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून सामाजिक, धार्मिक व परिचित वर्तुळातून तीव्र शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत. सौ. वृंदा कवठेकर या शांत, सुसंस्कृत आणि कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होत्या. दुपारी ४.३० वाजता प्रतापनगर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती श्रीधर ऊर्फ बापूसाहेब कवठेकर आहेत. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांसह परिचित वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.



# गरजू रुग्णांनी मोफत डायलिसिस सेंटरचा लाभ घ्यावा - आ. प्रशांत बंब

### उपजिल्हा रुग्णालयात मोफत डायलिसिस सेंटर सुरू; गंगापूरकरांना मोठा दिलासा

**त.भा. वृत्तसेवा,**
**गंगापूर, दि.५ जानेवारी :** डायलिसिससाठी वारंवार छत्रपती संभाजीनगर येथे जावे लागणाऱ्या गंगापूर व परिसरातील मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून, गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात मोफत डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. या सुविधेमुळे रुग्णांचा वेळ, आर्थिक खर्च तसेच शारीरिक त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

या मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते सोमवारी (दि. ५) उपजिल्हा रुग्णालय, गंगापूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेआहे. यावेळी नगराध्यक्ष संजय जाधव यांची विशेष उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कांचन बाने (उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर) होते.

कार्यक्रमास डॉ. दयानंद मोतीपकळे (सहायक संचालक, आरोग्य सेवा), डॉ. कमलाकर मुंडेकर (जिल्हा शल्य चिकित्सक), डॉ. प्रशांत बडे (निवासी वैद्यकीय अधिकारी), तसेच आरोग्य विभागातील इतर मान्यवर उपस्थित होते.

हे डायलिसिस सेंटर लाईफ केअर लिमिटेड, खारघर (मुंबई) यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आले असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना याचा मोठा फायदा होणार आहे. नियमित, वेळेत व मोफत डायलिसिस उपचार उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांचे जीवनमान उंचावण्यास निश्रि्चतच मदत होणार आहे. गंगापूर तालुक्यातील गरजू रुग्णांनी या मोफत डायलिसिस सेंटरचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी केले आहे.



यावेळी आमदार प्रशांत बंब, जिल्हाशल्यचिकिस्तक मुदखेडकर, वैद्यकीय अधिकारी डॉ बडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ खंदारे, नगराध्यक्ष संजय जाधव, मा नगरसेवक प्रदीप पाटील, रुग्ण कल्याण समिती सदस्य अतुल रासकर, भाग्येश गंगवाल, नगरसेवक विजय पानकडे, आबासाहेब शिरसाठ, आनंद पाटील, राकेश कळसकर, भारत पाटील, दीपक साळवे, मारुती खैरे, सचिन विधाटे, अमोल शिंदे, बापु शिंदे, रामेश्वर पाटील, कृष्णकांत व्यवहारे, प्रशांत मुळे, संकेत मते, विठ्ठल भटकर, गौरव तांगडे, अमोल शिंदे, संतोष गायकवाड, महंमद बाकोदा, रफिक दादा, प्रकाश खाजेकर, सलमान शेख, श्रीमंत चापे, संदीप बोजवारे, सोमनाथ शिंदे, आमदार प्रशांत बंब आरोग्य सेवक हनुमंत वानोळे अनिल चव्हाण, शिवराज दारूनटे अमोल साळवे आदीसह अधिकारी कर्मचारी उपस्थिती होते.

# जिजामाता वाचनालयास उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

**त.भा. वृत्तसेवा,**
**लासूर स्टेशन, दि.५ जानेवारी :** लासूर स्टेशन (ता. गंगापूर) येथील जिजामाता सार्वजनिक वाचनालयास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला.




सन १९८२ मध्ये स्थापन झालेल्या या वाचनालयाने गेल्या चार दशकांहून अधिक काळ ज्ञानप्रसार, वाचनसंस्कृतीची जोपासना व सामाजिक प्रबोधनाचे कार्य सातत्याने केले आहे. वाचनालयात सुमारे १५,००० विविध विषयांवरील ग्रंथसंपदा, मासिके व वर्तमानपत्रे उपलब्ध असून विद्यार्थ्यांसाठी ५० ते ६० आसनांची सुसज्ज व शांत अभ्यासिका कार्यरत आहे.

या अभ्यासिकेचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी महसूल, पोलीस, शिक्षण, आरोग्य, पंचायत राज आदी विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य वातावरण उपलब्ध करून देण्यात या वाचनालयाचा मोठा वाटा आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन जिल्हास्तरीय समितीच्या वतीने जिजामाता सार्वजनिक वाचनालयास हा सन्मान प्रदान करण्यात आला. या यशामागे वाचनालयाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्षसह सचिव तुषार सराफ तसेच ग्रंथपाल सौ.

# उंडणगाव अंगणवाडीत सावित्रीबाई फुले जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**
**सिल्लोड, दि.५ जानेवारी :** उंडणगाव येथील अंगणवाडी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या मूल्यांना अधोरेखित करणाऱ्या या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला.



कार्यक्रमाचे आयोजन अंगणवाडी सेविका शीला बोर्डे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. यावेळी मदतनीस ललिता पाटील यांच्यासह प्रीती पाटील, निर्मला वाघ, जाकीर शेख, शेरीपा पठाण, अशा खडके आणि सुनिता मोकासरे उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

# आपल्या कौशल्यात दररोज वाढ होणे आवश्यक : प्रा. यादव



**त.भा. वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि.५ जानेवारी :** वयाच्या कोणत्याही टप्प्यावर माणसाने शिकणे थांबवू नये. बदलत्या काळात स्वतःच्या कौशल्यात सातत्याने मूल्यवर्धन करणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन पद्मश्री प्रा. जे. डी. यादव यांनी केले. महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रसायन अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात ते प्राध्यापकांशी संवाद साधत होते. त्यांनी 'सिटियस, आल्टियस, फोर्टियस : ड्रायव्हिंग रिसर्च, इनोव्हेशन अँड ट्रान्सलेशन फॉर अ विकसित भारत थ्रू इंडियन अकॅडेमिया' या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, एमजीएम स्कूलच्या संचालिका डॉ. अपर्णा कक्कड, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, रसायन अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सदानंद गुहे तसेच विद्यापीठातील प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. यादव यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील संधी व आव्हाने मांडत अकॅडेमिक्स, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व सहाय्यक कर्मचारी हे संस्थेचे चार महत्त्वाचे स्तंभ असल्याचे नमूद केले. संशोधन व नवोपक्रमासाठी गुणवंत प्राध्यापकांची भरती, फेलोशिप योजनांचा विस्तार, उद्योग-अकॅडेमिया सहकार्य आणि पेटंट, पब्लिश, प्रॉस्पर या तीन 'पी'च्या सूत्रांवर भर देण्याचे त्यांनी आवाहन केले. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी प्रा. यादव यांच्या सूचनांवर एमजीएममध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे नमूद केले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार डॉ. सदानंद गुहे यांनी केले.

# शिक्षक संघ सोयगाव तालुकाध्यक्षपदी कृष्णा पाटील

### सरचिटणीसपदी दिपक बावस्कर यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**
**सोयगाव, दि.५ जानेवारी :** श्री अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या आवारात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, सोयगाव तालुका शाखेची सहविचार सभा जिल्हाध्यक्ष श्री. राजेश हिवाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. जिल्हा नेते संजय बागूल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नुकतेच निधन झालेले शिक्षक कै. अनिल भिमसिंग पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आदर्श शिक्षिका मंगलाताई बोरसे व सविता पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर



तालुका कार्यकारिणीची निवड खेळीमेळीच्या वातावरणात व लोकशाही पद्धतीने बिनविरोध पार पडली. यात तालुकाध्यक्षपदी कृष्णा पाटील, सरचिटणीसपदी दिपक बावस्कर, मुख्य तालुका संपर्कप्रमुखपदी परमानंद जयस्वाल, कार्याध्यक्षपदी रामेश्र्वर सावळे, कोषाध्यक्षपदी अतुल पाटील, प्रसिद्धीप्रमुखपदी गजानन ताडे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्र्वर मख



व अनमोल शिंदे, तर संघटकपदी योगेश फुसे यांची निवड झाली.

जिल्हाध्यक्ष राजेश हिवाळे यांनी मावळते तालुकाध्यक्ष दुर्गादास बलांडे व पूर्वीच्या कार्यकारिणीच्या कार्याचे कौतुक करत नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. सभेला शिक्षक संघाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नेते व शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन ताडे यांनी तर आभार रामेश्वर सावळे यांनी मानले.

# गांधेली येथे वृक्ष लागवड कामांची पाहणी

**त.भा. वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि.५ जानेवारी :** गांधेली ग्रामपंचायत अंतर्गत साई टेकडी परिसरात महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (चतडढक्र) मार्फत केलेल्या एक लक्ष ४५ हजार वृक्ष लागवड व जलसंधारण उपक्रमांची पाहणी आज (दि.५) करण्यात आली. गट विकास अधिकारी श्रीमती मिना रावतळे यांनी ही पाहणी केली.

या अंतर्गत साई टेकडी परिसरात वृक्ष लागवड, रोपांची गुणवत्ता, वाढ व दीर्घकालीन टिकाव, सिंचन, संरक्षण व नियमित देखभाल व्यवस्था, जलसंधारणाची विविध कामे व त्यांचा भूजलस्तरावर होणारा सकारात्मक परिणाम, ग्रामपंचायत गांधेली व स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग यासह उपक्रमाच्या नियोजन, अंमलबजावणी व प्रत्यक्ष परिणामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पाहणी दरम्यान कृषी अधिकारी दिनकर जाधव, विस्तार अधिकारी सोळशे, सरपंच मन्नू शेख, ग्रामपंचायत अधिकारी सलोनी खरात, अभियान सहयोगी दयानंद माने, जिल्हा कार्यक्रम समन्वयक किरण बिलोरे, प्रकल्प समन्वयक सतीश खंदारे, अमोल कुटे, रवी वाघमोडे, जलदूत महेश तळेकर यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८८१/ २०२५
पुढील तारीख ०९/०२/२०२६
अर्जदार:-१) गयाबाई रघुनाथ मांडवगड, वय ९१ वर्ष, व्यवसाय. २) ज्ञानेश्वर रघुनाथ मांडवगड, वय ५०वर्ष, व्यवसाय शेती. रा. डोणगाव रोड, इण्डेन गॅस जवळ, शिक्षक कॉलनी, हर्सुल, लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि.औरंगाबाद. ३) रामकिसन रघुनाथ मांडवगड, वय ४६ वर्ष, व्यवसाय शेती, ४) काकासाहेब रघुनाथ मांडवगड, वय ३७ वर्ष, व्यवसाय शेती, ५) व्दारकाबाई उत्तम पवार, वय ७१ वर्ष, व्यवसाय शेती, अर्जदार नं. १. ३. ४ व ५ रा धामोरी खुर्द, ता. गंगापुर जि.औरंगाबाद, ६) मंदा भाऊसाहेब शिंदे, वय ५२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. अनंतपुर, लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि.औरंगाबाद, ७) भिमाबाई किसन भवर, वय ४३ वर्ष, व्यवसाय शेती, रा.पेकळवाडी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद, ८) सुनिता कैलास झळके, वय ३९ वर्ष, व्यवसाय शेती, रा. वळदगाव, ता.जि.औरंगाबाद.
भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ अॅड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ८ यांचे पिता नामे रघुनाथ बारकु मांडवगड यांचा दि.१९/०३/२०२० रोजी मौजे धामोरी खुर्द, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन मयताची आई नामे सोनाबाई बारकु मांडवगड आणि वडील नामे बारकु मांडवगड यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत रघुनाथ बारकु मांडवगड आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ८ यांचा जन्म झालेला आहे. मयत रघुनाथ बारकु मांडवगड यांचे नावे सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लासुर स्टेशन अनंतपुर हर्सुल, ता. गंगापुर जि.औरंगाबाद या बँकेतील बचत खाते नं. ९१७५४८५५४६ मध्ये रक्कम रुपये २२,५४,००४/- अधिक व्याज या प्रमाणे रक्कम बँकेतील बचत खात्यात जमा आहे. मयत रघुनाथ बारकु मांडवगड यांचे नावे बँकेत जमा असलेली रक्कम मिळणे कामी अर्जदारांना वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच शासकीय, निमशासकीय, न्यायालयीन व कार्यालयीन कामासाठी पण वारसाहक्क प्रमाणपत्र आवश्यक आहे. करीता उक्त अर्जदारांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी दिले.
कनिष्ठ लिपीक, सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क स्तर
गंगापुर यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज नं.६५८/२०२५
पुढील तारीख ०३/०२/२०२६
अर्जदार : १) मथुराबाई भाऊसाहेब गंडे, वय ७९वर्ष, व्यवसाय निरंक, २) अनिल भाऊसाहेब गंडे, वय ५२ वर्ष, व्यवसाय शेती, ३) किरण भाऊसाहेब गंडे, वय ४३वर्ष, व्यवसाय शेती, सर्व रा.सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद
विरुद्ध
गैरअर्जदार : निरंक
प्रकरण: बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज.
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ अॅड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत भाऊसाहेब एकनाथ गंडे यांचा दि. २५/०८/२०२५ रोजी मौजे सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन मयत भाऊसाहेब एकनाथ गंडे यांची आई नामे सईबाई एकनाथ गंडे आणि वडील नामे एकनाथ गंडे यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत भाऊसाहेब एकनाथ गंडे आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ व ३ यांचा जन्म झाला आहे. मयत भाऊसाहेब एकनाथ गंडे यांना अर्जदार नं. १ ते ३हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत भाऊसाहेब एकनाथ गंडे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी दिले.
कनिष्ठ लिपीक
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क स्तर गंगापुर,
ता. गंगापुर जि.औरंगाबाद
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८३८/२०२५
पुढील तारीख ०४/०२/२०२६
अर्जदार: १). सुमनबाई कडु रणयेवले, वय ६९ वर्ष, धंदा शेती, २). जनार्धन कडु रणयेवले, वय ४६ वर्ष, धंदा मजुरी, ३). सिध्दार्थ कडु रणयेवले, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, अर्जदार नं. १ ते ३ रा धामोरी खुर्द, ता. गंगापुर जि.औरंगाबाद, ह.मु. लोहगाव, ता. राहता, जि.अहमदनगर, ४). विमल रमेश भिवसने, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. कोल्हार रोड, लोहगाव, ता. राहता जि.अहमदनगर, ५). उज्वला नामदेव बोर्डे, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. लोमेश्वर नगर, पोस्ट लोणी, ता. राहता जि.अहमदनगर, ६. वंदना अनिल साळवे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, रा. मुक्तापुर, ता.नेवासा जि.अहमदनगर
विरुद्ध
गैरअर्जदार:- निरंक
प्रकरण :-वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत
या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ अॅड. एस. पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन गंगाराम, उर्फ गंगा हरी रणयेवले हे दि.१६/०५/१९९३ रोजी मौजे धामोरी खुर्द, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु पावले असून मयताची पत्नी नामे भागुबाई गंगा रणयेवले यापुर्वीच मयत झालेली आहे. सदर दोन्ही मयतांना एक मुलगा नामे कडु गंगाराम रणयेवले हा होता सदर मुलगा दि.०२/०५/१९९०रोजी मृत्यु पावलेला आहे. मयत कडु गंगाराम रणयेवले यांची अर्जदार नं. १ हि पत्नी, अर्जदार नं. २ व ३ हे मुले व अर्जदार नं. ४ते ६ हया मुली आहेत. मयत गंगाराम उर्फ गंगा हरी रणयेवले यांना अर्जदार नं. १ ते ६हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत गंगाराम उर्फ गंगा हरी रणयेवले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०५/०१/२०२६ रोजी दिले.
कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश,क.स्तर सोयगांव
यांचे न्यायालय जि.औरंगाबाद
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ०८/२०२६
अर्जदारः-१) चंद्राबाई छगन चव्हाण, वय ६१ वर्षे, धंदा मजुरी, २)पवन छगन चव्हाण, वय २१ वर्षे, धंदा मजुरी, ३)राहुल छगन चव्हाण, वय ३० वर्षे, धंदा मजुरी, वरील १ ते ३ रा. नांदातांडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ४)मनिषा शिवराम राठोड, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. मांडवे बु., ता.जामनेर, जि.जळगांव. ५)अनुसया छोटू तवर, वय २२ वर्षे, चंदा घरकाम, रा. कु-हाड बु. ता. जामनेर, जि. जळगांव
विरुध्द
गैरअर्जदार- निरंक
प्रकरण - वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.
सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. वाय.आर. जावळे, सोयगाव, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत छगन जगलू चव्हाण हे दि. ३०/१०/२०२५ रोजी नांदातांडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क. १ ते ५ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ५ हे मयत छगन जगलू चव्हाण यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.पुढील तारीख ०९/०२/२०२६. आज दि. ०५/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.
विभागीय लिपीक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव
प्रत-
१)दिवाणी न्यायालय (क. स्तर), सोयगांव नोटीसबोर्ड
२) ग्राम पंचायत नांदातांडा, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद.

## अग्रलेख...

# दादागिरीचा आणखी एक नमुना

स्वत:ला बलशाली व आधुनिक म्हणविणाऱ्या अमेरिकेचा दुसऱ्या महायुद्धानंतरचा इतिहास धुंडाळला असता या तथाकथित लोकशाहीवादी देशाने सातत्याने शक्तिहीन आणि गरीब देशांवर आक्रमण केल्याचे दिसते. जवळपास ३० देशांना आपल्या हितासाठी अमेरिकेने लक्ष्य केले आहे. गेल्या पाच दशकांचा विचार केला तर कांगो, लेबनान, लिबिया, इराण, इराक, सोमालिया, सुदान, अफगाणिस्तान, सीरिया आदी अत्यंत गरीब आणि गृहयुद्धाने बेजार झालेल्या देशांवर अमेरिकेने आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले. इराककडे महाविनाशक अशी रासायनिक आणि जैविक अस्त्रे असल्याचा आरोप करीत २००३ मध्ये अमेरिका आणि नाटो फौजांनी इराकवर आक्रमण करीत त्या देशाचा विध्वंस केला. एवढेच नव्हे तर इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना पकडून कथित न्यायालयाचा वापर करीत फासावर चढविले होते. हा देश अजूनही सावरलेला नाही. गृहयुद्धाच्या आगीत सापडलेल्या या देशात जवळपास ५ लाख नागरिकांचा मृत्यू झाला. अफगाणिस्तानलाही अशाच पद्धतीने बरबाद केले गेले. जो देश अमेरिकेच्या तालावर नाचणार नाही, त्या देशाची सर्वच प्रकारे कोंडी केली जाते. त्यात व्हेनेझुएलाच्या रूपाने आणखी एका देशाची भर पडली आहे. नागरिक झोपेत असताना हेलिकॉप्टर्स आणि लढाऊ विमानांनी हल्ला करीत अमेरिकेने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले. पोलिसांनी एखाद्या गुंडाला ताब्यात घ्यावे अशा थाटात. मादुरो धडाचे नाहीतच; पण राष्ट्राध्यक्ष होतेच! असे किती तरी आहेत दुनियेत. तर अमेरिकेने अवघ्या अर्ध्या तासाच्या लष्करी कारवाईत मादुरोंना देशाबाहेर नेले. कितीही मतभेद असले तरी एखाद्या स्वतंत्र आणि सार्वभौम देशावर अशाप्रकारे हल्ला करून देशाच्या प्रमुखाचे अपहरण करणे आधुनिक जगात मुळीच शोभणारे नाही. ही निव्वळ दादागिरी आहे. हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषद घेतली. अमेरिका जे करू शकते, ते कोणताही देश करू शकत नाही, असे दर्पोक्तिपूर्ण विधान करीत आम्ही मादुरो यांना अटक केली असून व्हेनेझुएलावर आमचा ताबा असल्याचे त्यांनी जाहीर केले. वास्तविक पाहता लष्करी बळावर अमेरिकेने मादुरो यांचे अपहरण केले.

डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यापासून त्यांचा लहरी स्वभाव आणि धोरणांमुळे जगात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. भारतालाही त्याचा जबर फटका बसतो आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाला लक्ष्य का केले, याच्या खोलात गेलो तर असे दिसते की, दक्षिण अमेरिका खंडातील अनेक देश अमेरिकेचे वर्चस्व मान्य करण्यास नकार देत असतात. त्यात क्युबा, कोलंबिया, ब्राझील आणि व्हेनेझुएला आदी देशांचा समावेश आहे. गेल्या डिसेंबर महिन्यात अमेरिकेने कॅरेबियन समुद्रात जगातील सर्वांत मोठी विमानवाहू युद्धनौका यूएसएस जेराल्ड फोर्ड तैनात केली तेव्हाच ट्रम्प यांच्या मनात काळेबेरे असल्याची जाणीव झाली होती. सोबतच १५ हजार सैनिकही या क्षेत्रात आणले गेले होते. सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी मादुरो यांच्याविरोधात आघाडी उघडली. विनाशक जैविक आणि रासायनिक शस्त्रे-अस्त्रे असल्याचे आरोप करीत इराकवर आक्रमण करणाऱ्या अमेरिकेने व्हेनेझुएलावरही मादक द्रव्य तस्करीचे आरोप लावत हल्ला चढविला. दक्षिण अमेरिका खंडातील अनेक देश मादक द्रव्यांच्या तस्करीत सहभागी असल्याचे खरे असले तरी एखाद्या देशावर थेट हल्ला करावा व राष्ट्रपतीला अटक करून सार्वजनिकरीत्या त्यांचा अपमान करावा असा परवाना अमेरिकेला मिळालेला नाही. मादुरो यांच्यावर अमेरिकेतील न्यायालयात खटला चालविला जाणार असून, त्यांना कठोर शासन केले जाणार असल्याचे ट्रम्प यांनी जाहीर करून टाकले. तिथले तेल आमच्या ताब्यात आले आहे आणि आता अमेरिकन कंपन्या ते क्षेत्र विकसित करतील, असेही त्यांनी सांगून टाकले. खरे तर 'जिसकी लाठी, उसकी भैस' या उक्तीप्रमाणे अमेरिकेने व्हेनेझुएलाचा बेकायदेशीर ताबा घेतला आहे. जोपर्यंत योग्य सरकार सत्तेवर येणार नाही, तोपर्यंत हा देश आम्ही चालविणार, असे ट्रम्प यांनी जाहीर केले. याचा अर्थ असा की अमेरिकेला व्हेनेझुएलामधील जनतेशी काही घेणेदेणे नाही; अमेरिकेची गिधाडी नजर आहे ती तेलावर! कारण, या देशात कच्चे तेल आणि खनिजांचे प्रचंड साठे आहेत. अमेरिकेला या तेलसाठ्यांवर नियंत्रण हवे आहे आणि त्यातून जगातील इतर देशांना त्रास द्यायचा आहे. त्यात भारतही असू शकतो. कोणताही देश असू शकतो. व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्रपती ह्युगो शावेझ यांनी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांना सैतान संबोधले होते. बुश मला ठार मारण्याचा आणि आमच्या तेल साठ्यावर ताबा मिळविण्याचा कट रचत असल्याचा आरोपही शावेझ यांनी केला होता. शावेझ १९९८ मध्ये राष्ट्रपती म्हणून विजयी झाले होते. २००२ मध्ये त्यांच्याविरोधात लष्करी उठाव करण्याचा प्रयत्न झाला. यामागेही अमेरिकाच होती, हे नंतर उघड झाले. शावेझ यांनी देशातील अनेक खाजगी तेल कंपन्यांवर निर्बंध घातले आणि काहींचे राष्ट्रीयीकरण केले. परिणामी एक्सानमोबिल आणि कॅन्कोफिलिप्ससारख्या बड्या अमेरिकन तेल कंपन्यांना व्हेनेझुएलातून बाहेर पडावे लागले होते. याचा रागही अमेरिकेच्या मनात अद्याप आहे. शावेझ यांचेच अमेरिकाविरोधी धोरण निकोलस मादुरो यांनी २०१३ मध्ये सत्तेवर आल्यापासून राबविले. पण, मादुरो हे शावेझ यांच्यासारखे लोकप्रिय आणि कणखर राष्ट्रपती ठरू शकले नाहीत. मादुरो यांच्या कार्यकाळात व्हेनेझुएलाला मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. त्यांचा स्वभावही हुकूमशहासारखा असल्याने त्यांनी प्रशासनात अनेक लष्करी अधिकारी पेरले होते. जुलै २०२४ मध्ये झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मादुरो यांना विजयी घोषित करण्यात आले असले तरी निकालाचे परिणाम कधीच बाहेर आले नाहीत. विरोधी नेत्या एडमुंडो उरूतिया स्पष्टपणे विजेत्या असल्याचे दिसत होते.

व्हाईट हाऊसमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची वापसी होताच त्यांनी मादुरोविरोधात आघाडी उघडली. व्हेनेझुएलाच्या सशस्त्र दलातील एका प्रमुख ड्रग कार्टेलचे नेतृत्व मादुरो करीत असल्याचे आरोप लावत अमेरिकेने डिसेंबर महिन्यापासून कारवाईला प्रारंभ केला होता. १५ हजार सैनिक आणि लढाऊ विमाने कॅरेबियन समुद्रात तैनात करून व्हेनेझुएलाच्या जहाजांवर हल्ले केले. मादुरो यांची सत्तेवरील पकड ढिली झाल्याने ३ जानेवारीला पहाटे अमेरिकेने हल्ला करूनही कोणताही प्रतिकार झाला नाही. अमेरिकेचे जवान थेट मादुरो यांच्या निवासस्थानात घुसून त्यांना पकडून नेत असताना तेथील सुरक्षा जवान काय करीत होते, हा मोठा प्रश्न आहे. याचाच अर्थ मादुरो यांची व्यवस्था आतमधून पोखरली गेलेली होती. चीन, रशियासह जगभरातील अनेक देशांनी ट्रम्प यांचा निषेध केला आहे. खुद्द अमेरिकेच्या माजी उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनीही ही कारवाई बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. मादुरो हा क्रूर आणि अवैध शासक होता, हे खरेच. मात्र, सत्तापालट किंवा तेलाच्या नावाखाली लढलेली अशी युद्धे शक्तिप्रदर्शनच ठरतात. शेवटी ती अराजकतेत परिवर्तित होतात व त्याची किंमत अमेरिकन कुटुंबांनाही चुकवावी लागते. इतर देशांनाही त्रास होतोच. या कारवाईमागे तेलाशी संबंधित हितसंबंध आहेत, अशी थेट टीका हॅरिस यांनी केली आहे. अमेरिकेने आतापर्यंत ज्या देशांवर कारवाई केली, त्याचा फटका भारताला बसत आलेला आहे. इराणवर निर्बंध लादल्याने भारताला तेल आयातीत कपात करावी लागली. २००० ते २०१० या काळात ओएनजीसी व्हेनेझुएलाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करीत असे. २०१९ मध्ये अमेरिकेने निर्बंध लादल्याने भारताला तेल आयातीत मोठी कपात करावी लागली. २०२४-२५ या काळात भारताने फक्त ३६४ दशलक्ष डॉलर्स किमतीच्या तेलाची आयात केली होती. निर्यातही फारशी नाही. त्यामुळे इराण अथवा रशियाविरोधातील निर्बंधांमुळे भारताचे जेवढे मोठे आर्थिक नुकसान झाले, त्या तुलनेत व्हेनेझुएलावरील कारवाईमुळे मुळीच झालेले किंवा होणार नाही. पण, अमेरिकेचा खरा चेहरा पुन्हा एकदा जगासमोर आलेला आहे आणि तो शांतताप्रिय जगासाठी आव्हान ठरणारा आहे यात शंका नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# २०२६ : तावांग की तायवान!

तावांग खोरे आणि तायवान बेट! २०२६चे जागतिक राजकारण या दोन मुद्यांभोवती फिरणार काय, असा प्रश्न विचारीत २०२६ चा उदय होत आहे. हे दोन प्रश्न उपस्थित होण्यासाठी काही घटनाही घडल्या आहेत.

**चीनची नजर :** भारताच्या अरुणाचल प्रदेशातील तावांग खोऱ्यावर चीनची लाल नजर राहात आली आहे. चीनने तावांग खोऱ्यावरील आपला दावा कधीही मागे घेतला नाही. अरुणाचल प्रदेश हा भारताचा एक अविभाज्य भाग आहे हे चीन मान्य करावयास तयार नाही.

अशा या तावांग खोऱ्याबाबत सविस्तर चर्चा करणारा एक अहवाल मागील आठवड्यात अमेरिकन काँग्रेसला सादर करण्यात आला. 'मिलिटरी ॲण्ड सिक्युरिटी डेव्हलपमेंट इनव्हॉल्व्हिंग पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना' असे भारदस्त नाव असणाऱ्या या अहवालात तावांग व तायवानबाबत चीनच्या भूमिकेची सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. तावांग खोरे व तायवान यांना चीन आपल्या परराष्ट्र व संरक्षण धोरणाचा 'कोअर' मुद्दा मानत असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे.

**तणाव कायम :** भारत-चीन यांच्यात २०२० मध्ये संघर्ष झडला. त्यावेळी भारताचा बळकावलेला काही भाग चीनने आता रिकामा केला असला तरी दोन्ही देशांच्या लडाख भागातील सीमा तणावपूर्ण असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२० पूर्वी भारत-चीन सीमेवर जी शांतता होती, ती आता नाही. दोन्ही देशांचे सैन्य आजही युद्धसज्ज स्थितीत परस्परांसमोर उभे असल्याने या देशांची ३४८८ किलोमीटर लांबीची सीमा अशांत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेषत: हिवाळ्यात एवढे मोठे सैन्य या भागात ठेवणे खर्चाचे काम असते. पण, भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी चीनने आपले सैन्य सीमावर्ती भागात कायम ठेवले आहे. परिणामी भारतालाही आपले सैन्य तेथे कायम ठेवावे लागत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे दोन्ही देशांमध्ये परस्परांबद्दल असलेली अविश्वासाची भावना हे आहे आणि ही भावना आज तयार झालेली नाही तर १९६२ च्या चिनी आक्रमणापासून ती तयार झाली आहे. तावांग खोरे ताब्यात घेण्यासाठी चीन आज ना उद्या लष्करी कारवाई करील असा दावाही या अहवालात करण्यात आला आहे.

**तीव्र प्रतिक्रिया :** अमेरिकेन काँग्रेसमध्ये सादर करण्यात आलेल्या या अहवालावर चीनने लगेच तीव्र प्रतिक्रिया दिली. भारत-चीन यांच्या संबंधात खोडा घालण्याचा प्रयत्न या अहवालाच्या माध्यमातून करण्यात आला आहे, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केले. भारत-चीन संबंधात आलेला तणाव कमी करण्याचा प्रयत्न दोन्ही देशांनी मागील काही महिन्यात केला. त्यात थोडेफार यश आले हे खरे असले तरी दोन्ही देशांत सामान्य संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत हेही तेवढेच खरे आहे.



**२०१७ चा प्रस्ताव :** २०१७ मध्ये चीनच्या वतीने भारतासमोर एक प्रस्ताव ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यानुसार तावांग खोरे चीनला देण्यात यावे व त्या बदल्यात अक्साई चीनचा काही भाग चीन, भारताला देईल असा हा प्रस्ताव होता, असा दावा करण्यात आला आहे. मात्र, हा प्रस्ताव सरकारी होता की गैरसरकारी याचा खुलासा मात्र करण्यात आलेला नाही.

भारताने स्वाभाविकच हा प्रस्ताव स्वीकारला नाही. याची परिणती २०२० मध्ये भारत-चीन यांच्यात मर्यादित झडप होण्यात झाली काय, हा एक अनुत्तरित प्रश्न आहे. यातील काही बाबी अनुत्तरित असल्या तरी चीन अरुणाचल प्रदेशावरील आपला दावा सोडण्यास तयार नाही ही बाब मात्र वारंवार स्पष्ट झाली आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर अमेरिकन काँग्रेसला सादर करण्यात आलेला अहवाल एकदमच झिडकारून चालणार नाही.

**तायवानचा वेढा :** अमेरिकन काँग्रेसच्या या अहवालास बळ देणारी घटना म्हणजे २०२५ संपता संपता चीनने तायवानला घातलेला वेढा. चीनने हाँगकाँग गिळंकृत केले आहेच. तसेच त्याला तायवानही हवे आहे आणि ही बाब त्याने लपवून ठेवलेली नाही. रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांना 'ग्रेटर रशिया' हवा आहे. त्यासाठी त्यांनी युक्रेनवर हल्ला चढविला. अगदी त्याचप्रमाणे चीनला 'ग्रेटर चायना' हवा आहे.

तायवान हा ग्रेटर चायनाचा भाग असल्याचे चीनने वारंवार सांगितले आहे. २०४९ मध्ये चीनच्या कम्युनिस्ट राजवटीस १०० वर्षे पूर्ण होतील. त्यापूर्वी 'ग्रेटर चायना'चे स्वप्न पूर्ण करण्याची महत्त्वाकांक्षा राष्ट्रपती शी जिन पिंग बाळगून आहेत असे सांगितले जाते. चीनने वर्ष संपत असताना तायवानजवळ लष्करी कवायत केली. यात चिनी पायदळ, नौदल, वायुदल आणि रॉकेट फोर्स म्हणजे प्रक्षेपणास्त्र दळ यांनी सहभाग घेतला होता. तायवान व जगाला योग्य तो संदेश देण्यासाठी ही कवायत करण्यात आली होती.

तायवान हे चीनच्या मुख्य किनाऱ्यापासून केवळ १६० किलोमीटरवर असलेले एक लहानसे बेट. चीनला ते आपल्या ताब्यात घ्यावयाचे आहे. याची रंगीत तालीम म्हणून ही लष्करी कवायत करण्यात आली. तायवानला वेढा घालण्याची चीनची योजना आहेच. त्याने ती कधीही लपवून ठेवलेली नाही.

**जोरदार तयारी :** चीन मागील काही वर्षांत जागतिक आर्थिक महासत्ता झाला आहे. त्याला लष्करी सामर्थ्याची जोड देण्याची जोरदार तयारी त्याने चालविली आहे असे सांगितले जाते. २०३० पर्यंत आपला अण्वस्त्रांचा साठा एक हजारपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य चीनने निर्धारित केले आहे. आज अमेरिकची लष्करी ताकद त्याच्या नौदलात आहे. साऱ्या जगावर लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेने विमानवाहू युद्धनौकांचा ताफा तयार केला. त्याला प्रतिशह देण्याची तयारी चीनने चालविली आहे. २०३५ पर्यंत आणखी ६ विमानवाहू युद्धनौका आपल्या नौदलात सामील करण्याची त्याची योजना आहे.

**अण्वस्त्रांचा भूमिगत साठा :** चीनने आपल्या मंगोलिया सीमेजवळ भूमिगत अण्वस्त्रांचा साठा तयार केला असल्याचे म्हटले जाते. अण्वस्त्रे तयार करणे हे जेवढे कठीण काम आहे, त्यांचा सुरक्षित साठा करणे त्यापेक्षाही कठीण काम असल्याचे मानले जाते. यासाठी भूमिगत खोल असे काँक्रिट बंकर बांधण्यात आले असून, चीनने त्यात १०० अण्वस्त्रांचा साठा केला असल्याचे मानले जाते.

**तावांग की तायवान? :** चीनच्या डोक्यात भारताचे तावांग खोरे व तायवान बेट या दोन्ही बाबी पक्क्या आहेत. प्रथम तो तायवान बेट गिळंकृत करून मग आपली नजर तावांग खोऱ्याकडे वळवितो की प्रथम तावांग खोरे बळकावण्याचा प्रयत्न करतो हेच अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारताच्या तुलनेत तायवान लहान आहे. त्याची लष्करी ताकद मर्यादित आहे. त्यामुळे तो प्रथम तायवानला गिळंकृत करील असे काही संरक्षण तज्ज्ञांना वाटते तर काहींच्या मते चीन प्रथम तावांग खोरे ताब्यात घेण्याचा प्रयत्न करील. कारण तायवान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास अमेरिका व काही देश तायवानच्या मदतीसाठी धावून जातील.

**फक्त रशिया :** भारताच्या तावांग खोऱ्याबाबत मात्र तसे काही होणार नाही. फक्त रशिया भारताच्या मदतीला धावून जाऊ शकतो. पण, चीनसोबत असलेल्या त्याच्या घट्ट मैत्रीमुळे रशिया तटस्थ राहील. तावांगमध्ये लष्करी कारवाई करण्यापूर्वी पाकिस्तानला हाताशी धरून भारत-पाकिस्तान सीमेवर युद्धाचा भडका उडवून द्यायचा आणि वेळ पडली तर बांगलादेशलाही भारताविरुद्ध चिथावणी द्यायची.

भारत एकदम चीन, पाकिस्तान व बांगलादेश या तीन आघाड्यांवर लढू शकणार नाही असा विचार चीन करू शकतो, असे काही तज्ज्ञांना वाटते. भारताच्या भूमिकेतून विचार केल्यास अगोदर तावांग खोरे की अगोदर तायवानचे बेट हा मुद्दा निरर्थक आहे. चीन हा कधीही भारताचा मित्र होऊ शकत नाही हे गृहीत धरूनच भारताला आपली सुरक्षा व्यवस्था चोख ठेवावी लागणार आहे.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# भोजन, भजन सोबत व्हावे!

नुकतीच एक बातमी समोर आली की, आता नवीन पिढी आपल्या समस्यांचे उत्तर एआयकडे मागत आहे. समस्येचे स्वरूप कोणतेही असले तरी एआय त्याला आपल्या परीने उत्तर देतोय म्हणे. ही बातमी वाचून मनात विचारांचे काहूर माजले. घरातील मुलांना आपल्या समस्यांविषयी एआयला विचारावे लागणे, तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागणे हे फारच धक्कादायक आहे. असे का व्हावे, याचा विचार केला तर लक्षात येईल की, आज कुटुंबात आपापसातील संवाद कमी झाला आहे. आज घराघरातील चित्र डोळ्यासमोर आणले तर लक्षात येईल की, एकतर विभक्त कुटुंब आणि त्यातही सर्वांच्या स्वत:च्या वेळा ठरलेल्या. कोणी ऑफिस, कोणी शाळा, कॉलेज अशा व्यस्त दिनक्रमात अडकलेले. या सर्वांमध्ये कुठेतरी कुटुंबातील संवाद हरवतोय्. मुलगा दहावीनंतर कोणते क्षेत्र निवडावे, यासाठी मोबाईलवर शोधाशोध करतो. आई किंवा वडील यांच्याशी बोलण्याची त्याला एकतर गरज वाटत नाही किंवा तशी सवयच लागलेली नाही. दोन्ही बाबतीत जबाबदार पालकच आहेत. कारण त्यांनी आपल्या घरातील वातावरण तसे तयारच केले नाही की, एकमेकांच्या समस्या कोणी बोलेल. आपली भारतीय संस्कृती लोकांना जोडणारी आणि कुटुंबप्रधान अशी आहे. जेव्हा आपण 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतो तेव्हा आपल्याला आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? सुधारणेची सुरुवात घरापासूनच व्हावी, असे म्हणतात. त्यामुळे कौटुंबिक सौहार्द निर्माण करण्यासाठी आधी कुटुंबीयांमध्ये संवाद सुरू व्हायला हवा. घरातील मुलांना आपल्या माणसांविषयी आदर आणि आपुलकी असावी. हे वातावरण निर्माण करण्यासाठी आपणही मुलांच्या मनात विश्वास निर्माण करायला हवा की, कोणतीही परिस्थिती असो आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुमची कोणतीही समस्या असो आपण मिळून त्यावर तोडगा काढूया. अगदी मुलांच्या हातून चूक झाली तरी त्या परिस्थितीत त्याला सांभाळून कोसळण्यापासून वाचवले पाहिजे.

घरातील लोकांमध्ये संवाद निर्माण करण्यासाठी पुरातन काळापासून आपले पूर्वज सांगत आले की, भजन आणि भोजन हे कुटुंबातील लोकांनी एकत्र करावे. आताची स्थिती पाहता आठवड्यातून किमान एक ते दोन वेळा तरी कुटुंबातील सर्वांनी एकत्र जेवण घेतले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी जी पंचसूत्री दिली आहे, त्यात कुटुंब प्रबोधन हा विषय प्राधान्याने घेण्यात आला आहे. मुळात, आपण भारतीय कुटुंबाविषयी अतिशय संवेदनशील असतो. कोणी याला आपली कमजोरी म्हणेल पण, खरे पाहता हीच आपली शक्ती आहे. कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी जेव्हा एक व्यक्ती उभी ठाकते तेव्हा तिची प्रतिकारशक्ती आणि एखादे कुटुंब एकोप्याने उभे राहते त्याची शक्ती यात फरक पडतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला कुटुंबातून वेगळे केले जाते तेव्हा त्या व्यक्तीचीच नव्हे तर कुटुंबाचीही शक्ती कमी होते. नोकरी, व्यवसायानिमित्त मुलांनी दुसरे घर करणे, ही व्यावहारिक अपरिहार्यता असते. पण, आपणहून कुटुंबाशी नाते तोडणे हा प्रकार समाज व्यवस्थेसाठी घातक ठरतो. कुटुंबापासून वेगळे होणाऱ्या व्यक्तीमध्ये कायम एक असुरक्षिततेची भावना असते. ही भावना त्याला कधीही सक्षम बनू देत नाही. याउलट, कुटुंबाशी जोडलेली व्यक्ती, मग ती कोणत्याही निमित्ताने बाहेर असली तरी, सामाजिकदृष्ट्या आनंदी आणि सुरक्षित असते. तिच्या मनात ही भावना रुजविण्याचे काम कुटुंबातील वातवरण करत असते. म्हणून प्रत्येक कुटुंबातील पालकांनी आपल्या मुलांसोबत जेवणे, नाश्ता करणे, वेगवेगळ्या विषयांवर गप्पा करणे, सर्वांनी एकत्र बसून टीव्हीवरील एखादा चांगला कार्यक्रम पाहणे, एखाद्या नातेवाईक किंवा आप्तेष्टांना घरी बोलावून त्यांच्यासोबत वेळ घालवणे, सामाजिक कार्यक्रमांना, नाटकांना एकत्र जाणे, मुलांना वेगवेगळ्या विषयांवर बोलते करणे हे सर्व करायला हरकत नाही. किंबहुना ही काळाची गरज आहे. कुटुंबात आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात, हे मुलांना समजल्यानंतर त्यांची भरकटण्याची शक्यता आपोआपच निवळते. कुटुंब, समाज यामध्ये मिसळण्याची त्यांची वृत्ती वाढीस लागते. याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर नकळतपणे होतो आणि चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा धनी असणारा एक उत्तम नागरिकही बनू शकतो. नंतरच्या काळात तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी आपल्या अपत्याला स्वत:च्या समस्यांसाठी एआय किंवा तत्सम तंत्रज्ञानाकडे मदत मागण्याची गरजच भासणार नाही. यातून आपल्या कुटुंबातील मूल चांगले घडावे, ही प्रत्येकाची असणारी इच्छा फलद्रूप व्हायला मदत होईल. मात्र, त्यासाठी पालकांना थोडे प्रयत्न करावेच लागतील. त्यांच्या या प्रयत्नाचे चांगले फळ त्यांच्या अपत्याच्या जडणघडणीत दिसल्याशिवाय राहणार नाही आणि पर्यायाने एक चांगला समाज घडविण्याच्या प्रक्रियेत हे मोठे योगदान ठरेल.

७७५५९३८८२२

## प्रासंगिक

विजय पांढरीपांडे

# भावनिक बुद्धिमत्ताही महत्त्वाची

सध्या सगळीकडे एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा बोलबाला आहे. या नव्या तंत्राची अफाट क्षमता, त्याचे बरे-वाईट परिणाम, त्याचा नोकऱ्यांवर होणारा परिणाम, त्यातून निर्माण होणारे धोके, नैतिक प्रश्न अशा अनेक विषयांवर उलटसुलट चर्चा चाललेली आपण बघतो. मुळात कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्दप्रयोग चुकीचा वाटतो.

यात कृत्रिम असे काही नाही. कृत्रिम हात, कृत्रिम अवयव आपल्याला मूळ अवयवाचा अभाव जाणवू देत नाही. म्हणजे तो अगदी मूळ अवयवासारखाच असतो का? तर नाही. तो त्या अवयवाचे काम करतो. कृत्रिम पायाला संवेदना नसतात. कृत्रिम हात आपली कामे करताना मदत करेल. पण त्याला स्पर्शातले भाव कळणार नाहीत. म्हणजे जी मानवी नाही ती बुद्धिमत्ता. यात भावना, संवेदना याला थारा नसतो.

पण माणूस कोणतेही काम फक्त बुद्धीच्या आधारावर करत नाही. आपले विचार, आपले निर्णय हे बुद्धी आणि भावना दोन्हीचा उपयोग करून संतुलित पद्धतीने घेतलेले असतात. आपल्या निर्णयात काय चांगले, काय वाईट याचाही विचार असतो. कुणाला काय वाटेल, कुणी हे कसे स्वीकारेल याचाही आपण विचार करतो निर्णय घेताना. कृत्रिम बुद्धिमत्ता भावनेला थारा देत नाही. हे आपण नीट समजून घेतले पाहिजे.

औद्योगिक क्षेत्रात, आयटी संस्थांमध्ये, प्रॉडक्ट निर्मिती करताना, नव्या संकल्पना साकारताना केवळ उपयोगिता, आर्थिक बजेट (किंमत), सोय, आधुनिकता एवढाच संकुचित विचार करून चालत नाही. ते काम, तो प्रोजेक्ट हाताळणारी टीम, त्यातील प्रत्येकाची भावनिक गुंतवणूक तितकीच महत्त्वाची असते.

एखादी व्यक्ती कितीही बुद्धिमान असली, तिची निर्णयक्षमता, प्रतिभा कितीही उच्च पातळीची असली तरी उद्योग, प्रोजेक्ट हे सामूहिक टीम वर्क असते. टीममधील प्रत्येक जण एक दुसऱ्यावर अवलंबून असतो. एकाचे काम, त्याचे निर्णय हे दुसऱ्याच्या कामावर, निर्णयावर चांगला-वाईट परिणाम करीत असतातच.



टीममधील प्रत्येक पायरी, पातळी वरची व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी, टीमशी कशी वागते, यांचे परस्पर कोऑर्डिनेशन, अंडरस्टॅण्डिंग किती चांगले (किंवा वाईट) आहे यावर अंतिम निकाल अवलंबून असतो. इथे बुद्धी इतकीच भावना, संवेदना महत्त्वाची ठरते. एखादी व्यक्ती कौटुंबिक कारणाने अस्वस्थ असेल, शारीरिक, मानसिक व्याधीने त्रस्त असेल तर त्यामुळे ती साखळी तुटू शकते. अशावेळी एकमेकांना समजून घेणे, एक दुसऱ्याच्या भावनिक अडचणींची जाण असणे महत्त्वाचे ठरते.

सिंपथी, एम्पथी, पेशन्स, समजूतदारपणा या टीम वर्कसाठी, उत्तम निकालासाठी तितक्याच गरजेच्या आहेत जितकी बुद्धिमत्ता गरजेची आहे. प्रतिभा गरजेची आहे. अनेक कामावरच्या व्यक्ती, आपल्या अडचणी, घरगुती समस्या मोकळेपणाने स्वत:हून सांगत नाहीत. विशेष करून स्त्रियांच्या बाबतीत हे घडते. (पुरुषही याला अपवाद नाहीत) अशा वेळी टीम लीडरने सजग राहणे जास्त गरजेचे असते. कुणी सारख्या चुका करत असेल किंवा कुणाकडून दिरंगाई होत असेल, टाईमलाईनवर, टार्गेटवर परिणाम होत असेल तर त्या व्यक्तीला सर्रास दोषी ठरविण्याआधी, जबाबदार धरण्याआधी भावनिक पातळीवर संवाद साधून नेमकी कारणे जाणून घ्यायला हवीत. काही अपवाद सोडले तर सहसा कुणी मुद्दाम हलगर्जीपणा करीत नाही. कामात टाळाटाळ करणार नाही. त्यामागे काही तरी कारण असते. वैयक्तिक अडचण असू शकते.

काम, प्रोजेक्ट, टाईमलाईन, टार्गेट हेच टीम मेंबरचे सर्वेसर्वा आयुष्य नसते. त्याचेही घर, कुटुंब असते. मुलाबाळाची आजारपणे, घरात असलेल्या वृद्धाची काळजी अशा कितीतरी व्यक्तिगत समस्या असू शकतात. अशा परिस्थितीत आपण स्वत: कसे वागतो, स्वत:वर नियंत्रण कसे करतो, आतील उद्रेकाला कसे सामोरे जातो हे सगळे इमोशनल इंटेलिजन्समध्ये येते. मनावर ताबा मिळवणे, वागण्या-बोलण्यात संतुलितपण असणे, आपली अडचण लपंडाव न खेळता स्पष्टपणे सांगणे, आपण लीडर असलो तर दुसऱ्याची अडचण जाणून घेणे, हवी तिथे शक्य तितकी मदत करून त्या व्यक्तीला निराशेच्या वर्तुळातून बाहेर काढणे, अशा अनेक गोष्टी घरी दारी, कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या ठरतात. आपला बायोडेटा, ग्रेड्स, आपला पगार, पॅकेज, मिळणाऱ्या सोयी सुविधा याबरोबरच आपण जिथे काम करतो तिथले पोषक वातावरण तितकेच महत्त्वाचे असते. तिथल्या माणसांचे एकमेकांशी माणुसकीच्या नात्याने वागणे, एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना मदत करणे हे जास्त महत्त्वाचे असते. हा सगळा इमोशनल इंटेलिजन्सचाच भाग आहे. ऐहिक सुखे कितीही मिळाली, पायाशी लोळली तरी मानसिक समाधान नसेल, प्रत्येक जण आतून बाहेरून आनंदी नसेल तर बाकी सगळे व्यर्थ ठरते.

म्हणूनच आजच्या जगात या नव्याने आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेला इमोशनल इंटेलिजन्सची साथ अत्यावश्यक आहे. हा एकत्र प्रवास अधिक सुखदायी ठरण्याची शक्यता आहे. यावर बरेच काम चालू आहे. अशा नव्या संकल्पना सुरुवातीला नवी आव्हाने घेऊनच सामोरे येतात. त्यांचा स्वीकार करण्याआधी सर्वांगाने विचार करणे ही आपली नैतिक विवेकी जबाबदारी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना स्वत:ची बुद्धमत्ता गहाण ठेवणे, भावनांना तिलांजली देणे, माणुसकीचा विसर पडणे धोक्याचे ठरू शकते. आयुष्यात प्रत्येक क्षेत्रात सर्वांगी संतुलन महत्त्वाचे असते.

७६५९०८४५५५

## नव्या वर्षासाठी नवा संकल्प...

नवीन वर्ष म्हणजे नव्या आशा, नवे स्वप्न आणि नव्या संधींचे प्रतीक असते. जुने वर्ष मागे टाकताना आपण आपल्या चुका, अपयश आणि अनुभव यांतून काहीतरी शिकलेले असतो. त्यामुळे नव्या वर्षाच्या सुरुवातीला स्वत:साठी एखादा चांगला संकल्प करणे ही एक सकारात्मक परंपरा मानली जाते. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात बदल घडवून आणण्याची इच्छा असते.

नवीन वर्ष ही त्या बदलाची सुरुवात करण्याची योग्य वेळ असते. यावर्षी आपण अधिक चांगले व्यक्ती होऊ असा विचार मनात येतो. म्हणूनच लोक आरोग्य, शिक्षण, वागणूक, सवयी किंवा समाजोपयोगी कार्य याबाबत संकल्प करतात.

नवा संकल्प म्हणजे केवळ शब्दांत व्यक्त केलेली इच्छा नसून तो कृतीत उतरवण्याचा निर्धार असतो. संकल्प पाळण्यासाठी सातत्य, आत्मशिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असतो. अडचणी आल्या तरी हार न मानता प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे ठरते. नव्या वर्षाचा संकल्प हा स्वत:ला सुधारण्याचा एक मार्ग आहे. तो आपल्याला ध्येयाकडे नेतो आणि जीवन अधिक अर्थपूर्ण बनवतो. योग्य संकल्प केल्यास व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. नवीन वर्ष म्हणजे केवळ दिनदर्शिकेतील बदल नाही तर स्वत:मध्ये बदल घडवण्याची संधी आहे. प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार नवा संकल्प करून तो प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, तर नक्कीच आपले जीवन अधिक सुंदर आणि यशस्वी होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## 'अर्थकारण'मधील पराग परांजपे यांचा वाचनीय लेख

२९ डिसेंबर २०२५ च्या तरुण भारतातील अर्थकारण पुरवणीतील 'अर्थभान'मधील 'आकाशातील ग्रहांची गती मोजू शकतो पण माणसांच्या वेडगळपणाची नाही : सर आयझॅक न्यूटन' हा पराग परांजपे यांचा लेख खूप आवडला. मूलभूत आर्थिक साक्षरता नसेल, तर गुंतवणूक म्हणजे जुगार ठरतो. बाजार ही प्रयोगशाळा नाही आणि बाजार हे भौतिक शास्त्रासारखे शास्त्रही नाही. इतिहासातील प्रत्येक मोठी बाजार घटना, घसरणी, बुडबुडे, उन्माद यांचे मूळ गणितात नसून लोभ, भीती, अति आत्मविश्वास, कळप मानसिकता, अति उत्साह इत्यादी मानवी भावनेत आहेत. अहंकार लवकर नुकसान स्वीकारू देत नाही. बाजार अज्ञानाला नाही तर अहंकाराला अधिक शिक्षा करतो.

यशस्वी गुंतवणूकदार होण्यासाठी न्यूटन असण्याची गरज नाही. मानवी स्वभाव व स्वत:चा स्वभाव समजणे पुरेसे आहे, इत्यादी आणि दुसरे अनेक सुंदर मुद्दे त्यांनी सोप्या शब्दात समजावून सांगितले आहेत. असेच चांगले लेख तरुण भारताने प्रकाशित करावेत ही अपेक्षा.

**प्रा. सुरेश खेडकर**/९८२३२५५१८८

## वाचक पत्रे

## अमेरिकेचा सार्वभौम देशावर हल्ला अन्यायकारक

'अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हल्ला' ही बातमी वाचली याचबरोबर काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची लाईव्ह पत्रकार परिषदही ऐकली. गेली वीस-पंचवीस वर्षे लोकशाही मार्गाने सत्तेत असलेल्या एका सार्वभौम देशाच्या अध्यक्षाचे, सैन्य कारवाई करून, त्यांच्या पत्नीसह एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे, अपहरण करून त्यांना अमेरिकेत पळवून नेणे, ही अमेरिकेची जागतिक दादागिरी आहे. या कारवाईचे समर्थन करताना ट्रम्प आणि त्यांच्या प्याद्यांनी काल पत्रकार परिषदेत जी मखलाशी केली ती मनोरंजक होती. आपल्याच प्याद्यांकडून आपलीच आरती करून घेताना ट्रम्पची देहबोली बघण्यालायक होती. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरोंवर एकीकडे अमली पदार्थांच्या व्यापाराचे आरोप लावताना ट्रम्प यांनी, व्हेनेझुएलामध्ये लोकशाही मार्गाने सत्तांतर होत नाही तोपर्यंत व्हेनेझुएला आता अमेरिकेच्या नियंत्रणात राहणार असल्याचे सांगितले. व्हेनेझुएलामध्ये प्रचंड तेलसाठे आहेत आणि अमेरिकेचा त्यावर डोळा होताच. अमली पदार्थांच्या आरोपांआडून तेथील तेलसाठे लाटण्याचा ट्रम्पचा प्रयत्न आहे. तेथील तेलव्यापार आता अमेरिकेतील अनुभवी कंपन्या ताब्यात घेतील आणि अमेरिकेसाठी पैसा कमावतील, अशी घोषणाही कालच्या पत्रकार परिषदेत त्यांनी केली. यावरून जागतिक तेलबाजार ताब्यात घेण्यासाठी अमेरिका कासावीस झाली आहे, हे लक्षात येते. भारतावरही रशियाकडून तेल न घेण्यासाठी अमेरिकेने प्रचंड दबाव आणला होता. अर्थात आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दबावाखाली आले नाहीत हा भाग वेगळा. पण अमेरिकेच्या या दादागिरीला जागतिक पातळीवर जेवढा विरोध व्हायला हवा तेवढा होत नाही, हे गंभीर आहे. रशिया, चीन, उत्तर कोरियासारखे काही देश सोडले तर इतर देश गप्प बसले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघ आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोग अमेरिकेच्या प्रभावाखाली काम करत असल्यामुळे त्यांच्या विरोधाला कोणी काडीचीही किंमत देणार नाही, हे उघड आहे. मात्र अमेरिकेच्या दादागिरीवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर याच तऱ्हेने अमेरिका जगातील अनेक देशांवर अशी वेळ आणू शकते.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चिमुकल्या व्यावसायिकांनी जिंकली पालकांची मने!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
येथील फ्लाईंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये आज 'आनंद मेळावा' उत्साहात पार पडला. शालेय जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यावहारिक जगाचे धडे मिळावेत, या हेतूने आयोजित केलेल्या या मेळाव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आनंद मेळाव्याचे प्रेमा पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उदघाट्न करण्यात आले.

यावेळी शाळेचे प्राचार्य चतुर्वे दी, उपप्राचार्या जेकब, ज्युनिअर को-ऑर्डिनेटर जेकब आणि सिनिअर को-ऑर्डिनेटर काकडे उपस्थित होती. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी सजवलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल्स. खमंग भेळ, चविष्ट सँडविच, वडापाव आणि विविध थंड पेयांसह विद्यार्थ्यांनी केवळ पदार्थ विक्री केली नाही, तर 'मार्केटिंग', 'फायनान्स' आणि 'कस्टमर सर्व्हिस' यांसारख्या व्यावसायिक संज्ञांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

हिशोब करतानाची त्यांची अचूकता पाहून उपस्थित पालकांनी त्यांचे विशेष कौतुक केले.



### संक्षिप्त वृत्त...



### मुंबईच्या भाविकाकडून तुळजाभवानी मंदिरला ५१ हजार रुपयांची देणगी

**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**
नवी मुंबई येथील भाविक सतीश नारायण हिरे यांनी सहकुटुंब श्री कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर हिरे कुटुंबीयांनी देवीचरणी आपली भक्ती अर्पण करत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला रोख स्वरूपात ५१ हजार रुपयांची देणगी दिली. त्यांच्या या धार्मिक व सेवाभावी कार्याबद्दल मंदिर संस्थानच्या वतीने हिरे कुटुंबीयांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना श्री तुळजाभवानी देवीजींची प्रतिमा व महावस्त्र भेट म्हणून देण्यात आले. यावेळी सहायक जनसंपर्क अधिकारी अतुल भालेराव, उमाकांत क्षीरसागर तसेच संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




### व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत वैद्यनाथ कॉलेज परळी येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी भांडारकर हिने रौप्यपदक मिळवले व तिची मेंगलोर कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तर विराज जाधवर कांस्य पदक मिळविले व त्याची रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शक रेखाताई महाजन, अध्यक्ष पूनमताई महाजन, संस्था सचिव अॅड. मिलिंद पाटील, संस्था सदस्य शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील, डॉ. अभय शहापूरकर, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी अभिनंदन केले

### शिराढोण परिसरातून म्हैस चोरी; गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
शिराढोण पोलीस ठाण्यात फिर्यादी सुर्यकांत धोंडीराम धाकतोडे (वय ५६, रा. शिराढोण ता. कळंब) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिराढोण शिवारातील रायगव्हाण गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या शेत गट नं.१९७ अ मधील गोठ्यातून अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीची मुरा जातीची म्हैस अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही चोरी दि.२२ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८ ते दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.४ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून शिराढोण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.





### आरळी बुद्रूकचे महेश तानवडे यांना कलबुर्गी विद्यापीठाची डॉक्टरेट

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील महेश विलास तानवडे यांना कलबुर्गी (कर्नाटक) येथील शरणबसवा विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. महेश यांनी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अभ्यास व संशोधन विभागातून डॉ. बसवराजेश्वरी इंदूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्टडीज फॉर सिलेक्टेड एनडोक्राईन डिसरप्टिंग कम्पाउंडस इफेक्ट्स ऑन मेल रिप्रोडेक्टीव्ह ॲक्टिव्हिटीज इन अल्बिनो रॅटस या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. आरळी सारख्या ग्रामीण भागातून येऊन उच्च दर्जाचे संशोधन पूर्ण करणे ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे. या यशाबद्दल त्यांचे वडील विलास तानवडे, आई धानम्माबाई तानवडे यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच भाऊ सिद्राम तानवडे, रामेश्वर तानवडे, काका श्रीशैल्य तानवडे, प्रकाश तानवडे, गणेश तानवडे यांच्यासह आरळी बुद्रूक व परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, शिक्षक व नातेवाईकांनी डॉ. महेश तानवडे यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# दोन्ही नगरपरिषदेत धोबीपछाड; मतदारांसमोर जाण्याचा नैतिक अधिकार नाही

**सुजितसिंह ठाकुरांची तानाजी सावंतांवर नाव न घेता जोरदार टीका...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जानेवारी -**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा-जशा जवळ येत आहेत, तसे परंडा विधानसभा क्षेत्रातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असून नेत्यांमधील शाब्दिक संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे.



(दि.३) जानेवारी रोजी वाशी तालुक्यातील इंदापूर येथे पार पडलेल्या 'शिंदे गटाच्या विजय संकल्प मेळावा'त माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांनी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी आमदार राहुल मोटे तसेच आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली होती. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी परंडा येथे (दि.५) जानेवारी रोजी भाजपच्या एका कार्यक्रमात नाव न घेता सावंतांवर कडाडून टीका केली. ठाकूर म्हणाले, दोन्ही नगरपरिषद निवडणुकांत जनतेने त्यांना स्पष्टपणे धोबीपछाड दिली आहे.

त्यामुळे मतदारांसमोर जाण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही. ते पुढे म्हणाले, पालकमंत्री असताना भाजपच्या एकाही कार्यकर्त्याला साधा निधीही दिला नाही. फक्त लोकांचा प्रवेश करून घेण्याचीच भूमिका त्यांनी घेतली. जिल्हा परिषद निवडणुकांचा उल्लेख करत ठाकूर यांनी आक्रमक इशारा दिला. आम्ही ठरवलं तर येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांत त्यांना बुका लावू, असा थेट इशाराच त्यांनी दिला. निवडून आल्यापासून मतदारसंघात केवळ दोन-तीन वेळाच पाय ठेवला असल्याचा आरोप करत ठाकूर यांनी सावंतांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यानंतर आता पाटील आणि मोटे गटाकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे परंडा मतदारसंघासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

एकमेकांवर होत असलेल्या या टीका-प्रत्युत्तरांमुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परंडा विधानसभा क्षेत्रातील राजकीय घडामोडींना अधिक वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिराढोण परिसरात चोरीस गेलेली गाभण म्हैस अवघ्या काही दिवसांत जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
शेतकरी सूर्यकांत धोंडीराम धाकतोडे यांच्या शेतातून दहा महिन्यांची गाभण मुऱ्हा जातीची अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीची म्हैस चोरीस गेली होती. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ०२/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दरम्यान, दि.४ जानेवारी २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन कासार व त्यांचे पथक गस्त करीत असताना शिराढोण पोलीस ठाणे हद्दीत धाबा पाटी, शिराढोण पारधीपेढी परिसरात एका इसमास रात्रीच्या अंधारात एक म्हैस व एक रेडकू घेऊन जाताना आढळून आले. संशय आल्याने त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संबंधित इसम व जनावरांना पुढील चौकशीसाठी शिराढोण पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

सखोल चौकशीत सदरची म्हैस ही गु.र.नं. ०२/२०२६ मधील चोरीस गेलेलीच असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी पंचनामा करून १ लाख ४० हजार रुपये किमतीची म्हैस व रेडकू जप्त केली. आरोपी जालिंदर उर्फ पिंटू शंकर शिंदे (रा. ब्रह्मगाव, शेंडी पाटी, ता. वाशी, जि. धाराशिव) याच्याकडे चौकशी केली असता त्याने आपल्या दोन साथीदारांसह सदर म्हैस चोरी केल्याची कबुली दिली. पुढील कारवाईसाठी आरोपीला शिराढोण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार यांच्यासह पोह. शौकत पठाण (५७६), जावेद काझी (२८९), प्रकाश औताडे (९२९), फरहान पठाण (१२७५), चापोह. रत्नदीप डोंगरे (५३९) व चापोह. नवनाथ गुरव (६६२) यांनी केली.

## समुद्रवाणी येथे विवाहितेची आत्महत्या

**हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी-**
मयत तसलीम मोहसीन शेख (वय २७, रा. समुद्रवाणी ता. जि. धाराशिव) यांनी दि.२ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजता समुद्रवाणी येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी इक्रामहुसेन अकलाक हुसेन शेख (वय ३४, रा. इर्ला ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पती मोहसीन शेख, दिर आशपाक रुकमोद्दीन शेख तसेच सासू यास्मीने शेख (सर्व रा. समुद्रवाणी ता. जि. धाराशिव) यांनी मयत तसलीम हिच्या माहेरून दहा तोळे सोने आणण्याच्या कारणावरून तिला वारंवार शिवीगाळ, मारहाण व मानसिक छळ केला. हुंड्यासाठी दिलेल्या सततच्या त्रासाला कंटाळून तसलीम हिने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी दि.४ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०८, ८०, ८५, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## तुळजापूर बसस्थानकात खिसेकापूचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी-**
तुळजापूर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, फिर्यादी सोमनाथ बापुराव झेंडेकर (वय ६२, रा. प्लॉट नं. २२६, बीड बायपास, नाईकनगर, जि. संभाजीनगर) हे दि.४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकात सोलापूर-धुळे बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. गर्दीचा फायदा घेत आरोपी अरुण रावसाहेब काळे (रा. जामखेड) यांनी फिर्यादी यांच्या पॅन्टच्या मागील खिशातील ६,५७० रुपये चोरण्याचा प्रयत्न केला.

## परंडा विधानसभेत राजकीय हालचालींना वेग; वाशीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जानेवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्याने परंडा विधानसभा क्षेत्रात राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकांची घोषणा कधीही होण्याची शक्यता लक्षात घेता सर्वच राजकीय पक्षांकडून संघटनात्मक बांधणीला जोर देण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून परंडा विधानसभेचे माजी आमदार राहुल मोटे यांनी आघाडी घेतली आहे. भूम, परंडा व वाशी तालुक्यातील जिल्हा परिषद गट तसेच गावागावात कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्याचा सपाटा त्यांनी लावला असून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी रणनीती आखली जात आहे.

दि.४ जानेवारी रोजी वाशी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस पक्षाचे पदाधिकारी, स्थानिक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटन मजबूत करणे, बूथनिहाय तयारी तसेच निवडणुकीतील संभाव्य अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी राहुल मोटे यांनी कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लागण्याचे आवाहन करत, येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा प्रत्येक जिल्हा परिषद गटात फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## परंडा तालुक्यात भाजपचे 'अटल संमेलन' उत्साहात संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टी, परंडा तालुक्याच्या वतीने 'अटल संमेलन'चे आयोजन करण्यात आले. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जि.प. व पं.स.च्या निवडणुका भाजपा पूर्ण ताकदीने लढवणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

प्रत्येक जि.प. गट व पं.स. गणातून इच्छुक उमेदवारांकडून परिचयपत्र भरून घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. भाजपा नेते मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. येणाऱ्या निवडणुकांत भाजप मोठ्या ताकदीने मैदानात उतरणार असून प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, अॅड. नितीन भोसले, अॅड. गणेश खरसडे, अॅड. संतोष सूर्यवंशी, अरविंद रगडे, अॅड. जहीर चौधरी, सुखदेव टोंपे, बाबासाहेब जाधव, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, अर्जुन शिंदे, राजाभाऊ चौधरी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

## पराभवाने खचून जावू नका जनतेच्या कामात राहा यश जवळच आहे : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तुळजापूर न.पा.तील सर्व उमेदवारांचा सन्मान सोहळा संपन्न**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
तुळजापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या तसेच पराभूत झालेल्या सर्व उमेदवारांचा सन्मानपूर्वक सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी निवडून आलेल्या उमेदवारांनी जनतेने दाखवलेल्या विश्वासास पात्र ठरत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहावे, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करावा तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सर्वसमावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन करण्यात आले.

निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी खचून न जाता सामाजिक कार्य, जनतेशी असलेले नाते आणि लोकहिताचे उपक्रम अधिक जोमाने सुरू ठेवावेत, असा सकारात्मक संदेश यावेळी देण्यात आला.

निवडणूक हा राजकीय प्रवासातील केवळ एक टप्पा असून जनसेवा ही अखंड चालणारी साधना आहे.

विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहणे हीच खरी लोकशाहीची भावना असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन सर्व उमेदवारांनी लोकशाही प्रक्रियेत दिलेले योगदान मोलाचे असून तुळजापूरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे, समन्वयाने व सकारात्मक भूमिकेतून काम करणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, ऋषिकेश मगर, शाम मामा पवार, शामल वडणे, अर्जुन आप्पा साळुंके, सागर इंगळे, सुधीर कदम, राहुल खपले तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर बसस्थानकात खिसेकापूचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
तुळजापूर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, फिर्यादी सोमनाथ बापुराव झेंडेकर (वय ६२, रा.प्लॉट नं.२२६, बीड बायपास, नाईकनगर, जि. संभाजीनगर) हे दि.४ जानेवारी रोजी सायं. ७ वाजता तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकात सोलापूर-धुळे बसमध्ये चढत असताना ही घटना घडली.

गर्दीचा फायदा घेत आरोपी अरुण रावसाहेब काळे (रा. मिलींद नगर, भुतारा रोड, जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी फिर्यादी यांच्या पॅन्टच्या मागील खिशातील ६,५७० रुपये चोरण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.४ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## बालगंधर्व रंगमंदिर येथे 'आठवण माईंची' विशेष पुरवणीचे प्रकाशन

**दै. 'तरुण भारत'चे मान्यवरांकडून कौतुक... सिंधूताई सपकाळ यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री डॉ. सिंधूताई (माई) सपकाळ यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी दैनिक सोलापूर तरुण भारततर्फे माईंच्या कार्याला आदरांजली म्हणून प्रकाशित करण्यात आलेल्या 'आठवण माईंची' या विशेष पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



या प्रकाशन सोहळ्यास पद्मश्री गिरीश प्रभुणे, रेणुताई गावस्कर (अध्यक्षा - एकलव्य बाल शिक्षण व आरोग्य न्यास, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग), सेवा संकल्प प्रतिष्ठान (चिखली, जि. बुलढाणा), विलू पूनावाला फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जसविंदर नारंग, अनंत चिंचोळकर, ममता सिंधूताई सपकाळ, दीपक दादा गायकवाड, विनय सिंधूताई सपकाळ, प्रणव सातभाई, सागर बोधगिरे तसेच दैनिक तरुण भारतचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.

'आठवण माईंची' या विशेष पुरवणीमधून सिंधूताई सपकाळ यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी केलेल्या कार्याचा तसेच समाजाला दिलेल्या मोलाच्या संदेशांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. माईंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात सेवाभाव आणि माणुसकी जपण्याचा संदेश ही पुरवणी देते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी सिंधूताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आणि कार्याची आजच्या पिढीला अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, पत्रकार तसेच माईंच्या कार्याने प्रेरित असलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धेमध्ये नेत्रदीपक यश

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ जानेवारी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. तुळजापूर येथील स्वतंत्र संग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धा, रुक्मीनबाई बजाज काम खेडकर सुगम गायन स्पर्धा रेणापुर, इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्य प्रदेश, तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन या सर्व स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. त्याबद्दल जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक दत्ता सत्वधर, प्रबोधकांत समुद्रे, धनराज मैंद यांच्या उपस्थितीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला.



तुळजापूर येथील स्वतंत्र संग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये घुले प्रज्ञा दिनकर सर्वप्रथम यादव हिंदवी विष्णू सर्वतृतीय, गायकवाड ज्ञानदा सुनील सर्वचतुर्थ येण्याचा बहुमान मिळविला. रुक्मीनबाई बजाज काम खेडकर सुगम गायन स्पर्धा रेनापुर या स्पर्धेत देशमुख सुसंस्कृती विनोद हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले, इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्य प्रदेश यामध्ये मुळे आदर्श हनुमंत याला गोल्ड मेडल मिळाले तसेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन यामध्ये विवेकानंद शाळेला सर्वद्वितीय पारितोषिक मिळाले. यातील सहभागी विद्यार्थी बेडस्कर शिवम सुग्रीव, इंगळे कृष्णा ज्ञानेश्वर, नेहरकर रोहित कैलास इत्यादी. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे दत्ता सत्वधर, प्रबोधकांत समुद्रे, धनराज मैंद यांचेही याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.

# सावित्री आजही सुरक्षित नाही-प्रा.डॉ.गिरी वृषाली

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ जानेवारी**

रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे सावित्रीबाई फुले जयंती अतीशय उत्साही वातावरणात पार पडली.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी मुख्याध्यापक श्री.गोरे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.वृषाली गिरी व अश्विनी उगले उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे विचार मांडले. प्रमुख अतिथी उगले मॅडम यांनी मुलांमध्ये अजूनही मुलीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेला दिसत नाही अशी खंत व्यक्त केली. डॉ.वृषाली गिरी यांनी सावित्रीबाईंच्या काळातील सामाजिक परिस्थिती,महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि यासर्व दृष्टीने सावित्रीबाई यांनी खडतर परिस्थितीत केलेले कार्य याबाबत सखोल मार्गदर्शन करत आजच्या काळातही महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा दुषित आहे.आजही समाजात महिला व मुली कशा असुरक्षित आहेत हे मांडत खऱ्याअर्थाने जर महिला मुक्ती दिन साजरा करायचा असेल तर महिला भितीमुक्त होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.जर समाजात खऱ्याअर्थाने समानता आणायची असेल तर कायदे करून उपयोगाचे नाही तर मानसिकता बदलली पाहिजे असे मत व्यक्त केले.



अध्यक्षीय समारोप करताना गोरे यांनी महान व्यक्तींच्या जीवन कार्यातून, विचारातून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात त्यांचे विचार रुजवायला हवेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाईकनवरे यांनी केले तर आभार प्रदर्शन देशमुख यांनी केले.या कार्यक्रमासाठी रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गायकवाड, दांगट, सरवदे, वायबट, देवकते, देशमुख, सोनवणे, शेख, चाळक, शिंपले पवार व सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे रसाळ, घुले, चाटे, गवळी उपस्थित होते तसेच दोन्ही विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगावात पत्रकार संघाच्या पुरस्काराचे आज वितरण
## नुतन नगराध्यक्षांचाही होणार विशेष सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ जानेवारी**

माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव येथे खा. बजरंग बप्पा सोनवणे, आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज मंगळवारी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात पत्रकार संघाच्या वतीने विवीध पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे तर याच कार्यक्रमात माजलगाव नगरीच्या नुतन नगराध्यक्षा महरीन शिफा बिलाल चाउस यांचाही सत्कार माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येणार आहे.

यंदाचा दर्पण पुरस्कार हा जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगला प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दर्पण पुरस्कारासह विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-यांचा विशेष गौरव करण्यात येतो. यावर्षीही विवीध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असुन जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार व सन्मान नारीशक्तीचा या उपक्रमात माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान विवीध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दि. ६ जानेवारीला होणा-या दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर हे तर आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, नगराध्यक्षा शिफा बिलाल चाउस, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, मा. आ. डि. के. देशमुख, बाबुराव पोटभरे, अशोक डक, प्रा. मिलींद आवाड, जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, नितीन नाईकनवरे, भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास माजलगावकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, सचिव दिनकर शिंदे, कार्याध्यक्ष कमलेश जाब्रस, दत्ता येवले, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांचेसह माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

नुतन नगराध्यक्षांचा होणार सत्कार

माजलगाव नगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत विजय मिळविलेल्या नुतन नगराध्यक्षा महरीन शिफा बिलाल चाउस यांचा माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने याच कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

# प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी हैदराबादच्या तरुणीची ४०० किलोमीटर धाडसी बुलेटस्वारी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ जानेवारी**



हैदराबाद येथील नागरमणी डब्ल्यू या तरुणीने नव वर्षाच्या निमित्ताने हैदराबाद ते परळी असा तब्बल ४०० किलोमीटरचा प्रवास एकटीने बुलेटस्वारी करत केवळ सात तासांत धाडसाने पूर्ण केला आहे. बुलेटवरून धाडसी प्रवास करत परळीत प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनासाठी शनिवारी ती पोहोचल्यानंतर तिचे स्वागत करण्यात आले.

हैदराबाद येथील नागरमणी या तरुणीला बाईक रायडिंगची आवड आहे. तिने २०२६ या नव्या वर्षाची सुरुवात आध्यात्मिक व साहसी उपक्रमातून पूर्ण करण्याचा संकल्प केला होता. संकल्पानूसार तिने हैदराबादहून परळीपर्यंत दुचाकीवर एकटीनेच सलग ७ तासांचा धाडसी प्रवास पूर्ण केला आहे. रविवारी सकाळी परळीत प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतल्यानंतर तिने आनंद व्यक्त केला. परळीत दर्शनानंतर ती अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी रवाना झाली.

एकटीचा प्रवास प्रेरणादायी

महिलापण कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, हे या तरुणीच्या बाईक सवारीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आध्यात्मिक श्रद्धा आणि साहसाची तीने सांगड घालत केलेला हा प्रवास अनेक तरुण-तरुणींना प्रेरणादायी ठरणारा आहे.

वैद्यनाथाच्या दर्शनाने मन प्रसन्न

परळीत आल्यांनतर बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे स्पर्श दर्शनाने संपूर्ण प्रवासाचा थकवा क्षणात निघून गेला. इतक्या लांबचा प्रवास एकटीने करून येथे पोहोचल्याचे विशेष समाधान वाटते. प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतल्याने मन प्रसन्न झाले असून नव्या वर्षाची ही सुरुवात आयुष्यभर लक्षात राहील, असे नागरमनी हिने परळीत पोहोचल्यानंतर सांगितले.

अवघ्या ७ तासात हैदराबाद ते परळी एकटीने केला प्रवास

नागरमनीने अवघ्या सात तासात हैदराबाद ते परळी हे जवळपास ४०० किलोमीटरचे अंतर बुलेट रायडिंग करत पूर्ण केले. बुलेटवर एकटीने केलेल्या या धाडसी प्रवासाचे सर्वत्र कौतुक होत आहे. परळीत दर्शनानंतर रमणी ही अंबाजोगाई येथे योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी रवाना झाली.

# कारेगव्हाण येथे यात्रा उत्सवानिमित्त कुस्त्याचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

बीड तालुक्यातील कारेगव्हाण येथे ग्रामदैवत बिरोबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या यात्रा उत्सवाचा आणि कुस्त्याच्या कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शोकिनानी लाभ घ्यावा असे आवाहन कारेगावान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे

याबद्दल अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील कारेगाव येथे ग्रामदैवत बिरोबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंगळवारी दिनांक सहा रोजी संध्याकाळी संदलाची मिरवणूक निघणार आहे बुधवार दिनांक सात रोजी ताज्या यात्रेनिमित्त ग्रामदैवत बिरोबा देवाच्या पालखीची भंडाराची उधळण करीत वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक निघणार आहे रात्री गोंधळी गीते आणि लोकनाटच्च तमाशा मंडळाचामनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे गुरुवार दिनांक आठ रोजी या यात्रा उत्सवानिमित्त भव्य कुस्त्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे कुस्ती विजेत्यास योग्य प्रकारचे बक्षीस देण्यात येणार आहे तरी या यात्रा उत्सवाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शेवकिनांनी लाभ घ्यावा असे आवाहन कार्यगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे

# बालझुंबड - पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेत विद्यार्थ्यांचे दमदार सादरीकरण




**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जानेवारी**

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग २६ व्या बालझुंबड मधील पीपीटी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) स्पर्धा सोमवार, दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. संयोजक तथा मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित पीपीटी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध २६ विषयांवर आपले सादरीकरण दमदार पद्धतीने केले. ही स्पर्धा ५० गुणांची होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब कांबळे (सृजन प्राथमिक विद्यालय, चनई) हे तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार प्रशांत लाटकर, नगरसेवक सौ.रेखा विलासराव जाधव, प्राचार्य प्रशांत कुमार (न्यु व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई) आणि परिक्षक म्हणून मनोज कराड (खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई), आर्या गलनकर, शेख शाहेबाज, श्री.क्षीरसागर सर आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुज्य सानेगुरूजी यांच्या प्रतिमेचे पुजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचा सत्कार संयोजक समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख अतिथी पत्रकार प्रशांत लाटकर म्हणाले की, बालझुंबड मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते.

# धारूरमध्ये माजी सैनिकांच्या सन्मानासाठी उभारले जाणार भव्य 'भवन'; ७७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर!

**आमदार प्रकाशदादा सोळंके यांची मोठी घोषणा; नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा माजी सैनिक संघटनेकडून गौरव**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.५ जानेवारी**

देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, किल्ले धारूर येथील माजी सैनिकांच्या हक्काच्या 'माजी सैनिक भवना'साठी ७७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी ही घोषणा केली असून, नगरपरिषदेच्या माध्यमातून यासाठी जागाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, धारूर येथील माजी सैनिक असोसिएशनच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी माजी सैनिकांच्या वतीने सर्व नवनिर्वाचित प्रतिनिधींना फेटा, हार आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले.



७७ लाखांचा निधी आणि जागेचा प्रश्न सुटला

कार्यक्रमादरम्यान माजी सैनिक असोसिएशनने स्वतंत्र भवनाची आणि जागेची मागणी केली होती. या मागणीला तत्काळ प्रतिसाद देत आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी ७७ लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे जाहीर केले. देशासाठी आयुष्य वेचणाऱ्या सैनिकांच्या शिस्तीला आणि त्यागाला आमचा सलाम आहे. येत्या एक वर्षाच्या आत हे भवन उभे राहील आणि सैनिकांच्या दीर्घकालीन मागणीला न्याय मिळेल, असा विश्वास आमदार सोळंके यांनी यावेळी व्यक्त केला.

एकजूट आणि सामाजिक भान

धारूर तालुक्यात एकूण ३६१ माजी सैनिक असून, ही संघटना अत्यंत मजबूत आणि सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असते. ७७ लाखांच्या या निधीमुळे सैनिकांच्या सन्मानात मोठी भर पडली आहे.

या सोहळयास आमदार प्रकाशदादा सोळंके, नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, नवनिर्वाचित नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. मयूर सावंत, पत्रकार सूर्यकांत जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने माजी सैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्षपद माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष दत्ताभाऊ शिनगारे यांनी भूषवले, तर सूत्रसंचालन अनिल गव्हाणे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेच्या सर्व माजी सैनिकांनी अथक परिश्रम घेतले.

# ६ जानेवारी - दर्पण दिन
## मराठी पत्रकारितेचा आत्मा आणि समाजाचा आरसा



मराठी समाजाच्या वैचारिक इतिहासात सहा जानेवारी हा दिवस केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही; तो विचार, विवेक आणि सत्यनिष्ठेच्या प्रदीर्घ प्रवासाचा मैलाचा दगड आहे. ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण प्रकाशित झाले आणि त्यातून मराठी पत्रकारितेचा औपचारिक जन्म झाला. या ऐतिहासिक कार्यामागे होते बाळशास्त्री जांभेकर-आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीचे शिल्पकार, समाजप्रबोधनाचे दीपस्तंभ आणि निर्भीड लेखणीचे आद्य पुरस्कर्ते.

दर्पण म्हणजे केवळ एक वृत्तपत्र नव्हते;ते समाजाला स्वतःकडे पाहण्याचे साधन होते. अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक अन्याय, जातिभेद, प्रशासकीय जुलूम आणि परकीय सत्तेची दडपशाही-या साऱ्यांवर प्रश्न विचारण्याची धैर्यशील परंपरा दर्पणने सुरू केली. त्या काळात इंग्रजी सत्तेखाली दबलेला समाज, शिक्षणापासून वंचित घटक आणि बदलाची आस धरलेली तरुण पिढी-या सर्वांना दर्पणने शब्द दिले . पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी देणे नव्हे; तर समाजाला जागं करणे, प्रश्न विचारायला शिकवणे आणि सत्याची बाजू ठामपणे मांडणे-ही जाणीव बाळशास्त्री जांभेकरांनी पहिल्याच पानावरून समाजाला दिली .

स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रे ही केवळ माहितीची साधने नव्हती; ती स्वातंत्र्यलढ्याची शस्त्रे होती. लोकमान्य टिळकांचे केसरी आणि मराठा, गोपाळ गणेश आगरकरांचे सुधारक, महात्मा फुल्यांचे दीनबंधू, महात्मा गांधींचे यंग इंडिया आणि हरिजन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक, बहिष्कृत भारत आणि जनता-ही वृत्तपत्रे म्हणजे केवळ छापील कागद नव्हते ; ती विचारांची रणमैदाने होती . या वृत्तपत्रांनी जातिभेदाला आव्हान दिले, स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली, शोषितांचा आवाज बनले आणि स्वातंत्र्याची जाणीव सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचवली.

त्या काळात वृत्तपत्र वाचणे म्हणजे एक सामाजिक कृती होती . गावात एखादे वृत्तपत्र आले की ते चौकात, वाचनालयात किंवा चहाच्या टपरीवर वाचले जाई. एकजण वाचायचा आणि अनेक जण ऐकायचे. शब्द पसरायचे, विचार रुजायचे आणि समाज हलायचा. वृत्तपत्रांनी भारतीय समाजमन घडवले, राजकीय जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ दिले.

स्वातंत्र्यानंतर पत्रकारितेचा चेहरामोहरा बदलत गेला. प्रशासन, विकास, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, अर्थकारण, न्यायव्यवस्था या सर्व क्षेत्रांवर लक्ष ठेवणारी चौकशी पत्रकारिता विकसित झाली . ग्रामीण प्रश्न, दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, कामगारांचे प्रश्न - हे विषय मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम वृत्तपत्रांनी केले . मराठी पत्रकारितेने समाजाशी असलेली नाळ टिकवून ठेवली.

आजच्या काळात माध्यमविश्व प्रचंड वेगाने बदलले आहे. छापील वृत्तपत्रांबरोबरच दूरचित्रवाणी, वृत्तवाहिन्या, डिजिटल माध्यमे, संकेतस्थळे , समाजमाध्यमे-माहितीचे असंख्य प्रवाह निर्माण झाले आहेत. भारतात सध्या सुमारे वीस हजारांहून अधिक नोंदणीकृत वृत्तपत्रे प्रकाशित होत आहेत. मराठी भाषेतील दैनिके आणि साप्ताहिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे. वाचकसंख्या स्वरूप बदलत असली, तरी वृत्तपत्रांवरील विश्वास आजही टिकून आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी बातम्यांचा वेग वाढवला , तर डिजिटल माध्यमांनी पोहोच वाढवली . मात्र या वेगाच्या काळात सत्य, तपासणी आणि जबाबदारी यांचे महत्त्व अधिक वाढले आहे. अफवा, अर्धसत्य, सनसनाटीपणा आणि व्यावसायिक स्पर्धा-या आव्हानांमध्ये पत्रकारितेचा आत्मा जपणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.

दर्पण दिन आपल्याला आठवण करून देतो की पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही;ती एक सामाजिक बांधिलकी आहे. लेखणी ही तलवारीपेक्षा धारदार असते, पण तिचा वापर विवेकाने व्हायला हवा. सत्य, निर्भीडपणा, लोकहित आणि सामाजिक जबाबदारी-या मूल्यांवर उभी असलेली पत्रकारिताच समाजाचा खरा आरसा ठरते. बाळशास्त्री जांभेकरांनी पेटवलेली ही विचारांची ज्योत आजही मराठी पत्रकारितेतून उजळत आहे, आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत अखंडपणे जपण्याची जबाबदारी आपली आहे.आज दर्पणकडे पाहताना आपण स्वतःकडे पाहायला शिकले पाहिजे. आपण सत्यासाठी उभे राहतो का? अन्यायावर प्रश्न विचारतो का ? दुर्बलांचा आवाज बनतो का ? या प्रश्नांची उत्तरेच दर्पण दिनाचा खरा अर्थ ठरवतात. कारण पत्रकारिता जिवंत असते तोपर्यंतच लोकशाही जिवंत राहते.

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी रक्ताने मुख्यमंत्र्यांना लिहीले पत्र

## परिसरातील शेतकऱ्यांनी ईच्छा मरणाची केली मागणी, उबाठाचा मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

विकासाच्या नावाखाली शक्तीपीठ महामार्गद्वारे हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा व अप्पर पैनगंगा तसेच जायकवाडी लाभ क्षेत्रातील सुपीक व बागायती जमिनीचा बळी घेवू नका अशा आशयाची पत्र येथील बाधीत शेतकऱ्यांनी स्वत:च्या रक्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहीत शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा किंवा ईच्छा मरणाची परवानगी द्यावी अशी भावना निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे कळवली आहे.

उबाठा शिवसेनेच्यावतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी मोर्चा काढला होता. या मोर्चात मोठ्या संख्येने शक्तीपीठ महामार्गामुळे जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला होता. शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा किंवा आम्हाला ईच्छा मरणाची परवानगी द्यावी असे शेतकऱ्यांनी स्वत:च्या रक्ताने लिहीलेले निवेदन हातात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.

यावेळी माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे समन्वयक दिलीप कऱ्हाळे, ग्यानोबा हाके, गोपाळवीर, बापूराव ढोरे, उध्दव माखणे, प्रदीप गावंडे, अनिल चव्हाण, ईश्वर सवंडकर, सुरज माळेवार, ज्ञानेश्वर कऱ्हाळे, रामकिशन फुलझळके, चंद्रकांत मेंडके, अनिल शिंदे, सतीश देसाई, बालाजी डाढाळे, राजू वाघमारे, धोंडीराम कल्याणकरख, ॲड केतन सारंग, गौतम वाटोडे, रमेश सवंडकर, वैजनाथ डाढाळे, सुरेश पवळे, बाबुराव नवघरे आदींची उपस्थिती होती.

हिंगोली जिल्ह्यातील शक्तीपीठ महामार्गातील बाधीत शेतकऱ्यांनी रक्ताने लिहीलेल्या निवेदनात प्रस्तावीत शक्तीपीठ महामार्गासाठी होणाऱ्या जमीन अधिग्रहणाबाबत बाधीत शेतकरी गेली पावने दोन वर्षापासून हा अन्यायकारक महामार्ग रद्द करावा अशी मागणी करीत आहोत परंतु शासनाने जबरदस्ती जमिनीचे अधिग्रहण करण्याचा जुलमी प्रयत्न वारंवार चालू ठेवला आहे. या प्रकल्पासाठी संपादीत केली जाणारी जमीन ही अत्यंत सुपीक असून हळद, ऊस, केळी व फळ बागायती पिके घेतली जातात. जिल्ह्यात ८ साखर कारखाने आणि वसमत येथे हळद संशोधन केंद्र असे शेतीला चालना देणारे प्रकल्प असतांना दुसरीकडे महामार्गासाठी सुपीक जमिनी बळकावणे हे विरोधाभासी आहे.

शक्तीपीठ महामार्गाला पर्यायी समांतर नागपूर-रत्नागिरी मार्ग उपलब्ध असतानाही शक्तीपीठ महामार्गाचे प्रयोजन अप्रस्तूत व अन्यायकारक आहे. शेतकरी आणि शेती उध्वस्त करणारा हा महामार्ग रद्द करावा अथवा आमच्या परिसरातून या महामार्गाचे आरेखन बदलावे. शेतकऱ्यांच्या रक्ताने लिहीलेल्या भावना मुख्यमंत्र्यांनी लक्षात घ्याव्यात अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

# प्रत्येक कार्यकर्त्यांनी वाजपेयींचा आदर्श जपणे गरजेचे- प्रज्ञा सातव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

भारतीय संस्कृतीत अनेक परंपरा आहेत, तसेच थोरपुरुषांची परंपराही असते. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना देशाच्या वाटचालीत महान नेते म्हणून गणले जाते. त्यांनी केलेले कार्य अतिशय महान आहे आणि त्यांचा आदर्श प्रत्येक भाजप कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी आहे. साहित्यिक, वक्ता, कवी आणि लोकप्रिय नेते अशा अनेक क्षेत्रांत त्यांचे योगदान आहे, असे प्रतिपादन आ.प्रज्ञाताई सातव यांनी केले.

श्रीकृष्ण गार्डन मंगल कार्यालय, वसमत येथे माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी जी अटल स्मृती सम्मेलन कार्यक्रमात आ. प्रज्ञा सातवांनी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल. यावेळी आ.तानाजीराव मुटकुळे, भाजपा जिल्हाध्यक्ष माजी आ.गजाननराव घुगे, माजी आ.रामराव वडकुते, महिला जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांभाळे, डॉ.मारोती क्यातमवार, माजी जि.प सदस्य अंकुश आहेर, विष्णू बोचकरी, डॉ. अवधुत शिंदे, सोमाणी, ज्ञानेश्वर मुंजाळ, विलास गोरे यांच्यासह मोठ्या संख्येने पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.सातव म्हणाल्या की अटलजी हे दुरदृष्टी असलेले नेते होते नव्या पिढीला त्यांच्या कार्याचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. दोन खासदारांपासून १५ कोटी सदस्य, दीड हजार आमदारांचा मोठा प्रवास आहे. प्रखर वक्ता आणि राष्ट्रवादी गुणांनी परिपूर्ण माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे जीवन प्रेरणादायी आहे. त्यांनी नैतिक मूल्ये आणि देशप्रेमाची भावना भाजप कार्यकर्त्यात घर करून दिली, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी आ.तानाजीराव मुटकुळे यांनी भाषणात वाजपेयी यांच्या कार्याची माहिती दिली. यावेळी नगर परिषदेत निवडून आलेल्या सदस्यांचे सत्कार करण्यात आले. तसेच काही पक्ष पदधिकारी यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

माजी आमदार गजानन घुगे म्हणाले की, वाजपेयी हे अजातशत्रू व कवी मनाचे होते. त्यांनी देशात राजकारण आणि समाजकारण करताना अतिशय प्रामाणिकपणे काम केले आणि कार्यकर्त्यांची मजबूत सेना तयार केली. पंतप्रधान होऊन त्यांनी असामान्य कामगिरी केली. त्यांचा आदर्श आजच्या युवक, राजकीय नेत्यांनी स्वीकारून मार्गक्रमण करावे, असे आवाहन त्यांनी केले. घुगे म्हणाले की, माजी पंतप्रधान वाजपेयी यांनी भाजपला मोठी शक्ती, नवी ऊर्जा देण्यात त्यांचे मोठे योगदान दिल्याचे सांगितले.

# विद्यार्थी परिषदेच्या अधिवेशाच्या पोस्टरचे विमोचन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे यंदा ६० वे देवगिरी प्रांत अधिवेशन हिंगोली शहरात २३, २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्त अधिवेशनाच्या पोस्टरचे विमोचन भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव धुगे यांचेहस्ते करण्यात आले.

अभाविप ही शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करणारी जगातली सर्वात मोठी विद्यार्थी संघटन आहे. विद्यार्थी परिषद दरवर्षी आपले प्रांत अधिवेशन करत असते. या अधिवेशनात प्रांतातील मोठ्या प्रमाणात युवा तरुणाई विद्यार्थी एकत्र येतात. अधिवेशनात विविध शैक्षणिक व सामाजिक समस्यांवर सर्व विद्यार्थ्यांचे मत घेऊन त्या समस्या सोडविण्यासाठी प्रस्ताव पारित होतात. सोबतच शोभायात्रा काढली जात असून प्रांत अधिवेशनात अभाविप देवगिरी प्रदेशाचे नूतन अध्यक्ष, मंत्री आणि कार्यकारिणीची घोषणा केली जाते. तरुणाईला दिशा, प्रेरणा व नेतृत्वाला मंच देणारे यंदा देवगिरी प्रांताचे ६० वे अधिवेशन २३,२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंगोली येथे आयोजित करण्यात आले आहे. हिंगोली येथे पहिल्यांदाच देवगिरी प्रांताचे अधिवेशन होत आहे. या पार्श्वभूमीवर सोमवार दि ५ जानेवारी रोजी अधिवेशन पोस्टरचे विमोचन करण्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष गजानन घुगे, भाजयुमो जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, अभाविप देवगिरी प्रदेश सहमंत्री प्रवीण पांडे, अभाविप हिंगोली शहर अध्यक्ष प्रा.डॉ. सुधीर वाघ, शहर मंत्री आविष्कार गिरीकर, जिल्ह्यातील अन्य मान्यवर हे उपस्थित होते.



**हिंगोली- येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात सोमवारी ईश्वर चिठ्ठीद्वारे पोलिस पाटील आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साजरी

हिंगोली- येथील वंजारी सेवा संघ, शाखा अंजनवाडी यांच्या वतीने हनुमान मंदिर समोर राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी वंजारी सेवा संघाचे मराठवाडा अध्यक्ष तथा श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष एकनाथराव कुटे, सरपंच जयराम कुटे, दत्तराव दराडे, लिंबाजी कुटे, रुस्तुमराव कुटे बाबाराव सानप, दिगंबर कुटे, किसन सांगळे, सोपान नागरे सूर्यभान दराडे, विठ्ठल कुटे, नारायण घोळवे, पांडुरंग दराडे, पवन सांगळे, सुभाष सांगळे, लक्ष्मण फड उत्तम कुटे, दादाराव नागरे, बाबाराव घुगे, नागनाथ कुटे, शंकर नागरे, मल्हारी नागरे, प्रभाकर गीते प्रभाकर गीते, सारंग कुटे, दत्ता कुटे, सतीश कुटे पंढरी कुटे, प्रताप सांगळे, बाळू कुटे, हरीराम कुटे तसेच गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साजरी करत असताना त्यांच्या कार्याविषयी भावना व्यक्त करताना दत्तराव दराडे यांनी संत भगवान बाबा हे आध्यात्मिक, शैक्षणिक उंची मिळावी यासाठी बाबा अहोरात्र चंदनासारखे झिजले. त्यांचा सुगंध आजही दरवळत आहे. शैक्षणिक क्रांतीत सहभागी होताना बाबांनी अनेकांना शाळा काढण्याची प्रेरणा दिली. या कार्यक्रमा हरीराम कुटे यांच्या कडून अन्नदान करण्यात आले.

### मध्यवर्ती बँकेसमोर निराधार महिलांच्या रांगा




हिंगोली- येथील जिल्हा मध्यवर्ती बँक परभणीच्या हिंगोली शाखेत निराधारांचे मानधन जमा झाले असून मानधन मिळावे यासाठी निराधार महिलांनी सकाळपासूनच बँकेच्या आवारात गर्दी केली होती. अनेक महिन्यानंतर हे मानधन आल्यामुळे महिलांनी गर्दी केल्याचे दिसत होते.

### गोरसेनेकडून शालेय साहीत्य वाटप




हिंगोली- येथील सेवासदन वस्तीगृहातील मुलांना गोरसेनेकडून शालेय साहीत्याचे वाटप करण्यात आले यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण, मीरा कदम, विलास चव्हाण, विजय जाधव, एकनाथ राठोड, भारत चव्हाण आदींची उपस्थिती होती.

# आर्ट ऑफ लिवींगच्या शिबीराचा स्वच्छता उपक्रमाने समारोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

आर्ट ऑफ लिविंगच्या वतीने आयोजित सातदिवसीय अनुभव शिबिराचा रविवारी खटकाळी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून यशस्वी आणि उत्साहपूर्ण समारोप करण्यात आला.

या सात दिवशीय शिबिरात सहभागी साधकांना मानसिक शांती, शारीरिक आरोग्य व सकारात्मक जीवनशैलीसाठी उपयुक्त अशा विविध प्राणायाम व ध्यान पद्धतींचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरादरम्यान सुदर्शन क्रिया, उज्जयी श्वास, भस्त्रिका प्राणायाम आदी तंत्रांचा नियमित सराव करून साधकांना तणावमुक्त जीवनाचा अनुभव देण्यात आला. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक दिवशी साधकांनी श्वसन, ध्यान आणि आत्मचिंतनाचा सराव केला.

शिबिराच्या समारोपप्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत खटकाळी येथील हनुमान मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मंदिर परिसर स्वच्छ करून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या उपक्रमाला शिबिरार्थी सहभागी झाले होते. स्वच्छता उपक्रम झाल्यानंतर मंदिर समितीच्या वतीने सर्व साधकांना प्रसाद देण्यात आला. या अनुभव शिबिरामुळे सहभागी साधकांमध्ये आत्मविश्वास, शांती आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. आर्ट ऑफ लिविंगच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून भविष्यातही असे शिबिर आयोजित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# अनुसया विद्यामंदिरात बाल विवाह मुक्त भारत उपक्रमांतर्गत कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरपलवार तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे यांच्या नियोजनानुसार अनुसया विद्यामंदिर, खटकाळी (ता. जि. हिंगोली) येथे बाल विवाहमुक्त भारत या उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बालविवाहाचे दुष्परिणाम, बालविवाह प्रतिबंध कायद्यातील तरतुदी तसेच बालकांच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण विकासावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे, बाल संरक्षण अधिकारी जरीबखान पठाण, चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे केसवर्कर राजरत्न पाईकराव उपस्थित होते. तसेच अनुसया विद्यामंदिरचे मुख्याध्यापक नरेंद्र मोगरगे, अंकुश वानखेडे आदी शिक्षकवृंद, महिला कर्मचारी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये बालविवाह प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण होऊन बालविवाहमुक्त समाज घडविण्याचा संदेश देण्यात आला.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध गुटख्यासह आरोपीला पकडले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हिंगोली शहरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली की रामलीला मैदान जवळील वस्तीतील घरामध्ये एका इसमाने अवैधरित्या गुटख्याची साठवणूक केलेला आहे त्यावरून सदर ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारला असता सदर ठिकाणी एक नामे इस्माईल खा पठाण , वर ५६ वर्ष, रा. शिवाजी सभागृहाच्या पाठीमागे रामलीला मैदान जवळ हिंगोली , ता.हिंगोली जि.हिंगोली हा शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री करत असल्याबाबत खात्री झाल्याने त्याची चौकशी केली असता त्याच्या ताब्यातून २३,९८० रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आरोपी विरुद्ध अन्नसुरक्षा अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे, पोउपनी दिलीप मोरे, पोलिस अंमलदार नितीन गोरे, धनंजय क्षीरसागर, इंगोले, अशोक धामणे, गणेश लेकुळे, मुजीब पठाण यांच्या पथकाने यांनी केली आहे.

# हळद व्यापाऱ्याची १४.७४ लाखांची फसवणूक, औंढ्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जानेवारी**

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथील व्यापाऱ्याची १४ लाख ७४ हजार रूपयांची फसवणूक करणाऱ्या गुजरात राज्यातील तीन हळद व्यापाऱ्यांवर औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथील किशोर पारडे हे हळद खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. गुजरात राज्यातील तीन व्यापारी हळद खरेदीसाठी दि १८ जुलै २०२५ रोजी शिरडशहापूर येथे आले होते. त्यांनी किशोर पारडे यांच्या दुकानावर जाऊन त्यांच्याकडून २७ टन पॉलिश हळद खरेदी केली होती. सदर हळदीच्या खरेदी पोटी तिघांनी २२ लाख ६८ हजार रूपये दिले होते. उर्वरित १४ लाख ७४ हजार रूपये नंतर देतो असे सांगून त्यांनी वाहनात हळदीचे पोते भरून नेले.

दरम्यान, काही दिवसानंतर किशोर यांनी त्या व्यापाऱ्यांशी संपर्क साधला. यावेळी त्यांनी दि १५ नोव्हेंबर २०२५ रोजी आणखी १८ टन हळद पाठवून देण्याबाबत कळविले. मात्र पूर्वीचे पैसे दिल्यानंतरच १८ टन हळद पाठवून दिली जाईल असे किशोर यांनी स्पष्ट केले. परंतु त्यानंतर त्यांनी किशोर यांच्याशी संपर्कच केला नाही. याप्रकरणात किशोर यांनी त्या व्यापाऱ्यांशी संपर्क साधून वारंवार विनंती केली असतांनाही त्यांनी पैसे पाठवलेच नाही. त्यामुळ आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच किशोर यांनी रविवारी औंढा नागनाथ पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून औंढा पोलिसांनी अंजूम सय्यद रा सुरत, मोहम्मद आसीफ अब्दुल वाहीद मलीक, अन्नवर अब्दुल वाहीद मलीक दोघे रा. अहमदाबाद यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक जी एस राहीरे, उपनिरीक्षक वाघमारे, जमादार रवीकांत हरकाळ हे करीत आहेत. शेतकरी आधीच आस्मानी आणि सुलतानी संकटात असतांना त्यांची फसवणूक होत असल्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

# मुख्य निवडणूक निरीक्षकांनी महापालिकेत घेतली आढावा बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जानेवारी-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथूर यांनी सोमवारी महापालिकेस भेट दिली. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व काटेकोर पध्दतीने पार पाडण्यासाठी त्यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महापालिका मुख्यालयात मुख्य निवडणूक निरीक्षकांना निवडणूक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच्या सुरुवातीस उपायुक्त नितीन गाढवे यांनी निवडणूक कामकाज तसेच आर्जपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबतची माहिति सादर केली. ज्यामध्ये छाननीची प्रक्रिया पार पडलेली असुन निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटपाची प्रक्रिया सुध्दा सुरळीतपणे पार पडली असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे निवडणूक लाढविणाऱ्या उमेदवारांचा तपशील, मतपत्रिका छपाई,मतदान यंत्रे, मतदान यंत्रे तयार करणे, स्ट्रॅाँग रुम व्यवस्था,क्षेत्रिय अधिकारी नियुक्ती, मतदान केंद्रांचा तपशील, मतदान व मतमोजणी प्रशिक्षण, टपाली मतदान,मतदान साहित्य व वितरण,वाहतुक व्यवस्थापन, मतमोजणी,मतदार जनजागृती अभियान,आचारसंहिता अंमबजावणी,तक्रार निवारण कक्ष व एक खिडकी कक्ष इत्यादी बाबतच्या माहितीचे




सादरीकरण मुख्य निवडणूक निरीक्षका समोर करण्यात आले.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत राबविण्याच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक निरीक्षकांनी काही आवश्यक त्या सूचना बैठकीत दिल्या. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, कर्मचाऱ्यांना योग्यरित्या प्रशिक्षण देणे, एतच् तयार करतांना योग्य ती दक्षता घेणे, दारु, पैसे इत्यादी अमिषांचा वापर होणार नाही याची काळजी घेणे, निवडणूक प्रक्रियेदरम्यान पारदर्शकता, अचूकता व सुरक्षेचे सर्व निकष पाळले जात असल्याची खात्री करणे, निवडणुकीदरम्यान अवैध हालचालींना आळा घालण्यासाठी महामार्गावरील तपासणी नाक्यांवर कडक वाहन तपासणी करण्याच्या इत्यादी महत्वाच्या सूचना निवडणूक निरीक्षकांनी केल्या. तसेच शहरातील संवेदनशील भागांची माहिती पोलीस प्रशासनाकडून घेत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत पोलीस विभागाच्या वतीने पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील मुख्य निडणूक निरीक्षकांपुढे ठेवला. त्यात प्रामुख्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन जवळपास ६०० व्यक्तींना हद्दपार करण्यात आले असुन ३३० व्यक्तींना नॉन-बेलेबल वॉरंट बजावण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे अवैध मद्यसाठा / मद्यविक्री संदर्भात एकुण १७ गुन्हे दाखल करण्यासह अवैद्य शस्त्रास्त्र बाळगणे प्रकरणी ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संवेदनशील / अतिसंवदेनशील असलेल्या २१ मतदान केंद्रावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त व रा.रा.पो.बलाचे जवान तैनात करण्यासह स्ट्राँग रुम व मतमोजणी केंद्रावर आवश्यक तो बंदोबस्त करण्यात येणार असुन पोलीस मुख्यालयात २४७ नियंत्रण कक्ष स्थापण करण्यात आल्याचे यावेळी पोलीस अधिक्षकांनी सांगितले.

**वेब कास्टींगसह उउढतची राहणार करडी नजर**

एकुण मतदान केंद्रापैकी २४७ मतदान केंद्रे ही परदानशिन असुन या सर्व मतदान केंद्रांवर अतिरिक्त महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असुन परदानशीन मतदान केंद्रावर परदानशीन मतदारांची ओळख पटवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या तसेच आर्थिक बाबींच्या दृष्टीने संवेदनशील मतदान केंद्रांची संख्या ७० अशी असुन या मतदान केंद्रांवर थशल उरींळपस ची व्यवस्था करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त ६ किंवा ६ पेक्षा जास्त मतदान केंद्र असणाऱ्या एकुण १४ इमारतीमधील ८८ बूथवर CCTV कॅमरे बसविण्याचे नियोजन करण्यात आल्याचे यावेळी *मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.महेशकुमार डोइफोडे यांनी स्पष्ट केले. या बैठकीस सर्व अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, क्षेत्रिय अधिकारी व पालिकेचे इतर विभाग प्रमुख उपस्थित होते.

## आशा सेविकाच्या अडी-अडचणी सोडवण्यास प्राधान्य : आ.कोहळीकर

**हदगाव** -क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जंयतीनिमीत्य शनिवार ३ जानेवारी रोजी आमदार बाबुराव कदम कोहळीकर, सिटु संलग्न आशा वर्कर संघटना राज्य सचिव तथा नांदेड जिल्हा अध्यक्षा उज्वला पडलवार यांच्या उपस्थितीत हदगांव शहरांतील संत रोहीदास सभागृहात शिवसेना सर्कल प्रमुख गजानन अनंतवार कवानकर यांच्या आयोजनातुन हदगांव तालुक्यातील आशा वर्करचा सन्मान व मार्गदर्शन सोहळा संपन्न झाला. यावेळी उपस्थित आमदार कोहळीकर यांनी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकत आशा वर्कर च्या अडी अडचणी सोडवण्यास प्राधान्य देण्यात येईल असे सांगीतले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख शितल भांगे पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय मुरमुरे,हिमायतनगर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मुनेश्वर , माजी सभापती बालासाहेब कदम, माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजीराव लांडगे , माजी नगराध्यक्षा ज्योती राठोड, नगरसेवक गोपाल भाऊ सारडा, शिवसेना शहर प्रमुख बबनराव माळोदे, आबा वानखेडे, बाबुशराव कदम, नामदेव वाकोडे, जेष्ठ पत्रकार श्याम लाहोटी,शिवसेना महिला तालुका अध्यक्षा दुर्गाताई भारती, अश्विनी गिरी, सविता निमडगे, मोनिका राठोड, आशाताई वाठोरे, वैजंता आसोले,ओमस्वाती फुले , संघटनेच्या तालुका हदगांव गट प्रर्वतक वर्षा सांगडे ( गायकवाड) उपाध्यक्षा यमुना जाधव, मीनाक्षी बागल,सुरेखा कांबळे, सचिव प्रतिभा सातव, यांच्यासह शकुंतला पोले,निर्मला निखाते ,वंदना मुधोळ,सांरजा ठाकरे,रमा जाधव तालुक्यातील आशा वर्कर विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.सुत्रसंचलन तालुका वर्षा सांगडे यांनी केले तर आभार आयोजक गजानन अनंतवार कवानकर यांनी केले.

## गोडसे परिवारांच्या वतीने मोफत महाआरोग्य निदान शिबिर

**मुदखेड** -माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे यांच्या मातोश्री स्वर्गीय राजमनीबाई विश्वनाथराव गोडसे यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त दि. ४ डिसेंबर रोजी मोफत महाआरोग्य निदान शिबिराचे आयोजन गोडसे परिवाराच्यावतीने करण्यात आले होते. सर्वप्रथम कै. राजमनीबाई विश्वनाथ गोडसे यांच्या प्रतीमीचे गोडसे परिवारांच्या हस्ते पुजन व पुष्पहार अर्पण करून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोफत महाआरोग्य निदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. या शिबिरात मोफत नेत्र तपासणी , मधुमेह तपासणी , रक्तदाब तपासणी तज्ञ डॉक्टरांच्या टीम कडून करण्यात आले. व रुग्णांना मोफत चष्म्यांचे तसेच औषधीचे वाटप करण्यात आले. रुग्णांच्या तपासणीनंतर गंभीर स्वरूपाच्या आजार असणाऱ्या रुग्णांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

गोडसे परिवाराच्या या उपक्रमामुळे गेल्या दहा वर्षापासून शहरातील गोरगरीब रुग्णांना मोफत आरोग्य शिबिराचा लाभ मिळत आहे. यावेळी विश्वनाथ गोडसे , सिताराम गोडसे , नागनाथ गोडसे , भगवान गोडसे ,बालाजी गोडसे, पंढरीनाथ गोडसे , कैलास गोडसे सुरेश गोडसे , व्यंकटेश गोडसे , राजीव गोडसे , गणेश गोडसे, नितीन गोडसे , सचिन गोडसे , सुमित गोडसे , लखन गोडसे, गोविंद गोडसे , साई गोडसे , अक्षय गोडसे , प्रतीक गोडसे , यश गोडसे, रुद्र गोडसे , अक्षराज गोडसे, रियांश गोडसे, यासह विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते नवनिर्वाचित नगरसेवक व जेष्ठ नागरिकांची उपस्थीती होती.

## विकास नरबागे यांची देगलूर काँग्रेस युवक शहराध्यक्षपदी निवड

**देगलूर** -देगलूर येथील आंबेडकरी चळवळीचे युवा कार्यकर्ते विकास नरबागे यांची नुकतीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस युवक शहराध्यक्षपदी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंत पाटील व अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली. या निवडीबद्दल आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ता म्हणून विकास दत्ताजी नरबागे यांची चांगलीच ओळख आहे. महाविद्यालयीन काळातच नेतृत्व करण्याची तीव्र इच्छाशक्ती असलेला विकास नरभागे हा देगलूर महाविद्यालयाचा विद्यार्थी सचिव राहिलेला आहे. आंबेडकरी चळवळीतील संघटना युवा पँथरचा तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस युवक पक्षाचा तालुका कार्याध्यक्ष आणि भीमप्रहार सामाजिक संघटनेचा संस्थापक अध्यक्ष म्हणून नरबागे महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक आदीं क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम राबविले आहेत. रक्तदान शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी 'एक पेन, एक वही' उपक्रम, दंत तपासणी शिबीर, बौद्ध स्मशानभूमीसाठी शवदाहिनीकरीता प्रयत्न, तसेच विविध सामाजिक उपक्रम नरबागे यांनी राबवित सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. विकास नरबागे यांच्या कार्याची दखल घेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून देगलूर काँग्रेस युवक शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंत पाटील, रामदास पाटील सुमठाणकर, माजी नगराध्यक्ष तथा शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार, नगरसेवक मीरामोहीय्योदीन, नगरसेवक सय्यद मोहितोद्दीन रफाई, नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, माझी उपनगराध्यक्ष बिस्मिल्ला खुरेशी, नगरसेवक प्रतिनिधी शेख महेमुद, माजी नगरसेवक निसार देशमुख, नगरसेवक लालू कोयलावार, नगरसेवक प्रतिनिधी सुनिल येशमवार, काँग्रेस शहर उपाध्यक्ष फायक अली आदीं मान्यवरांनी उपस्थितीत निवड करण्यात आली. यावेळी नरबागे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून युवक शहराध्यक्षपदी निवड केली आहे, या पदाचा मी प्रामाणिकपणे काम करीन, असे त्यांनी सांगितले.

## किनवट नगर परिषदेत सुजाता येंड्रलवार यांचा पदग्रहण सोहळा




**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ५ जानेवारी-**

किनवट नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी आज नगर परिषद कार्यालयात आयोजित पदग्रहण सोहळ्यात औपचारिकरित्या पदभार स्वीकारला. या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी मुंगाजी काकडे यांनी सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्याकडे अधिकृत पदभार सुपूर्द केला.

पदग्रहणापूर्वी विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. नगर परिषद कार्यालयात झालेल्या या सोहळ्यास नवनिर्वाचित नगरसेवक, त्यांचे प्रतिनिधी, नगर परिषद अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सौ. सुजाता येंड्रलवार यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी आणि पारदर्शक प्रशासन देण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. नगर परिषद कर्मचाऱ्यांनी नवनियुक्त नगराध्यक्षेचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जयपाल जाधव यांनी केले. पदग्रहण सोहळ्यानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## कुंटूर पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यांवर धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ जानेवारी-**

नायगाव तालुक्यातील कुंटुर पोलीस ठाणे हद्दीत अवैध दारू विक्रीविरोधात कुंटुर पोलिसांनी मोठी व निर्णायक कारवाई करत दारू माफियांच्या मुसक्या आवळल्या आहेत. मौजे बळेगाव येथे सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू विक्रीची गोपनीय माहिती मिळताच कुंटुर पोलिसांनी तात्काळ हालचाली करत थेट आरोपीच्या घरावर छापा टाकला.

आज रोजी सपोनि विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मल्लिकार्जुन कारामुंगे, बिट अंमलदार पोहेकॉ पवार, स्वामी, तसेच महिला पोलीस अंमलदार सुनिता अलमोड यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली.

छाप्यादरम्यान आरोपी नागेश दत्ता बेलकर (वय ४३, रा. बळेगाव, ता. नायगाव) यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी दारूचा साठा आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करूनदेशी दारू १८ हजार ८० रूपये ची व विदेशी दारू ३ हजार ९७५ रूपये असा एकूण २२ हजार २५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



या प्रकरणी पोलीस स्टेशन कुंटुर गु.र.नं. ०३/२०२५, कलम ६५ (ई) महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गत आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

**अवैध धंद्यांना खणखणीत इशारा**

कुंटुर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, बेकायदेशीर धंद्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा सपोनि विषाल भोसले यांनी दिला आहे. तसेच नागरिकांनीही अशा अवैध व्यवसायाची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांचा आज पदग्रहण सोहळा ; आ. चिखलीकरांसह मान्यवराची उपस्थिती

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ५ जानेवारी-**

लोहा शहरांसाठी आजचा ( ६ जाने) ऐतिहासिक दिवस ठरणार असून सर्वसामान्य कुटुंबातील शरद पवार शहराचे प्रथम नागरिक म्हणजे लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाचा पद्भार घेणार घेणार आहेत. नगरपालिका मैदानावर मंगळवारी सकाळी अकरा वाजता आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य दिव्य पदग्रहण सोहळा संपन्न होणार आहे , नगर पालिकेच्या ३८ वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदात कोणत्या एका राजकीय पक्षाला एकहाती सता मिळाली आहे .

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने थेट जनतेतून नगराध्यक्ष व २० पैकी १७नगरसेवक निवडून आणले आहेत. पालिकेच्या ३८ वर्षाच्या इतिहासात हे



पहिल्यांदाच घडले आहे . राज्याचे आजी-माजी मुख्यमंत्री यांनी लोहा नगर पालिका प्रतिष्ठेची केली होती परंतु शहरवासियांनी पुन्हा आ. प्रतापरावांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला व अभूतपूर्व विजय मिळवून दिला आहे

सर्वसामान्य कुटुंबातील व कोणताही मोठा राजकीय वारसा नसलेले शरद पवार हे थेट जनतेतून मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत .६ जानेवारी रोजी नगराध्यक्ष' म्हणून पदग्रहण करणार आहेत हा शहरवासियांसाठी ऐतिहासिक दिवस ठरणार आहे.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यासाठी पक्षाचे नेते माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे , माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. अविनाश घाटे, माजी आ. सुभाषराव साबणे, प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर,

प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष (दक्षिण) शिवराज पाटील होटाळकर, जिल्हाध्यक्ष (उतर) बाळासाहेब रावणगावकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार

नांदेड शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, प्रदेश संघटक अँड मुक्तेश्वर धोंडगे , जेष्ठ नेते माणिकराव , युवा नेते सचिन पाटील चिखलीकर , तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, माजी सभापती आनंदराव पाटीक शिंदे, माजी सभापती सोनालीताई ढगे, माजी सभापती खुशाल पाटील पांगरीकर, यासह नवनिर्वाचित नगरसेवक व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. जून्या शहरातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचा अभिषेक होईल तदनंतर वाजतगाजत मिरवणूक निघणार असून सर्व महा मानवास अभिवादन करण्यात येणार आहे व त्यानंतर हा ऐतिहासिक पद्ग्रहण सोहळा पार पडणार आहे. तेव्हा या भव्य दिव्य सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आहे आहे

## सरूबाई हेसे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ५ जानेवारी-**



मुखेड तालुक्यातील हाळणी येथील श्रीमती सरूबाई काशिनाथअप्पा हेसे यांचे रविवार दि.४ जानेवारी रोजी रात्री ११.३० वाजताच्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८५ वर्षाच्या होत्या.

त्यांच्या पश्चात मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे व पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवार दि.५ रोजी दुपारी ३.३० वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीमती सरूबाई हेसे या नूतन महाविद्यालय सेलू येथे कार्यरत असलेले प्रा.उमाकांत हेसे यांच्या आई होत.

## हिंद-दी-चादर शहीदी समागम कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशासन सज्ज

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जानेवारी-**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी, गुरुद्वारा प्रशासन तसेच विविध समाजातील अशासकीय सदस्यांचा सहभाग असलेल्या २५ विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्येक समितीने आपापली नेमून दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.



हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नाकर गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे जगदीश सकवान, मुख्यमंत्री सहायता निधी राज्य समन्वयक डॉ. रितेश पाटील, गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, विविध समित्यांचे प्रमुख व सदस्य उपस्थित होते.

नांदेड येथे राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्यासह आजूबाजूच्या अकरा जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून भव्य स्वरूपाची तयारी करण्यात येत असून, सर्व नियोजनासाठी २५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. समिती प्रमुख व सहकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी वेळेत व परिपूर्ण नियोजनासह पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांनी दिल्या.

**कार्यक्रम नियोजनासाठी समित्या गठीत**

जागरण व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समिती, मंडप व्यवस्थापन समिती, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थापन समिती, सुरक्षा व्यवस्थापन समिती, स्वयंसेवक व्यवस्थापन समिती, अतिथी स्वागत समिती, लंगर/भोजन व्यवस्थापन समिती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, वैद्यकीय सेवा समिती, विद्युत व ध्वनी व्यवस्थापन समिती, प्रसिद्धी व मीडिया समिती, कार्यक्रम सादरीकरण समिती, ध्वज व सजावट समिती, आर्थिक व्यवस्थापन समिती, शासकीय परवानगी समिती, जुताघर व्यवस्थापन समिती, जलपुरवठा समिती, महिला सेवा समिती, ज्येष्ठ नागरिक समिती, जिल्हा समन्वय समिती, स्वरूपा व्यवस्थापन समिती, सुरक्षा व तपासणी समिती, निवास व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी समिती व राखीव समिती.

या समित्यांमध्ये शासकीय अधिकारी, गुरुद्वारा प्रशासनातील प्रतिनिधी तसेच विविध समाजातील अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून, सर्वांच्या सहकार्याने हिंद-दी-चादर शहीदी समागम कार्यक्रम संस्मरणीय ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.